मंगळवार, 5 जुलै 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 300
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 5 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-300 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-8 • PRICE-5


## हैदराबादमध्ये भाजपचे 'भाग्य' उजळणार

### पंतप्रधान मोदी, योगी आदित्यनाथांनी दिले मोठे संकेत

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद : तेलंगणामध्ये भाजपची ताकद आधीपेक्षा दुपट्टीने वाढली आहे. महापालिका निवडणुकीनंतर भाजपची ताकद अधिक वाढली आहे. म्हणूनच निवडणुकांआधी भाजपने तेलंगणासाठी रणनिती ठरवली आहे. भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारणीत झालेल्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी हैदराबादचा उल्लेख भाग्यनगर असा केला. पंतप्रधानांनी भाग्यनगर असा उल्लेख केल्याने देशात राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. हैदराबादचे नामांतर भाग्यनगर करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसे झाल्यास पुढील निवडणुका भाजपसाठी सोप्या जाणार आहेत.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी हैदराबादचा उल्लेख भाग्यनगर केला. मात्र, हैदराबादच्या नामांतराची चर्चा होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. याआधीही फेब्रुवारीमहिन्यात हैदराबादच्या दौऱ्यावर असताना पंतप्रधानांनी भाग्यनगर असा उल्लेख केला होता. रविवारी पुन्हा एकदा असाच उल्लेख केल्याने चर्चांना उधाण आलं आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांनी इथूनच एक भारत श्रेष्ठ भारत नारा दिला, असंही मोदींनी म्हटलं आहे. दरम्यान, आरएसएस हैदराबादला नेहमी भाग्यनगर म्हणत असते. त्यामुळं आता भाजप हैदराबादचे नामांतर भाग्यनगर करणार असल्याच्या चर्चांना उत आला आहे.

यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रचारादरम्यान भाग्यनगर असाच उल्लेख केला होता. नोव्हेंबर २०२० मध्ये, जेव्हा योगी आदित्यनाथ महापौरपदाच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी हैदराबादला आले होते, तेव्हा त्यांनी जाहीरपणे सांगितले होते, की भाजप सत्तेत आल्यास शहराचे नाव भाग्यनगर केले जाईल. त्याचवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे नागरी निवडणुकांच्या प्रचारासाठी हैदराबादला गेले होते आणि तेथे त्यांनी भाग्यनगर मंदिराला भेट देऊन दिवसाची सुरुवात केली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने चांगली



कामगिरी केली आहे.

भाग्यलक्ष्मी मंदिरावरुनच हैदराबादचे नामांतर भाग्यनगर करण्याची मागणी होत आहे. हैदराबादचे नाव पूर्वी भाग्यनगर असेच होते, गोलकोंडाच्या कुतुबशाही वंशाचे ५ वे सुलतान कुली कुताब शाह यांनी भाग्यनगर नाव बदलून हैदराबाद केलं होत, असा दावा भाजप नेत्यांनी केला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी याआधीही आपल्या भाषणात हैदराबादचं नामांतर भाग्यनगर व्हायला हवे. फैजाबादचे अयोध्या, अलाहबादचे प्रयागराज होऊ शकतं तर हैदराबादचे भाग्यनगर का नाही होऊ शकत, असे योगी आदित्यनाथ यांनी म्हटले होते.

#### योगी आदित्यनाथ यांनी केली पूजा

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी ऐतिहासिक चारमिनारजवळील भाग्यलक्ष्मी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. योगी वीस मिनिटे मंदिरात होते. त्यांनी तेथे विशेष पूजाही केली. त्यांच्या समवेत तेलंगणचे प्रदेशाध्यक्ष बंडी संजयकुमार, राज्यसभेतील खासदार के. लक्ष्मण आणि आमदार राजासिंह होते. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीसाठी योगी हैदराबादमध्ये आले होते.

## ‘अग्निपथ’चा वाद आता सर्वोच्च न्यायालयात

### पुढील आठवड्यात होणार सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या नव्या अग्निपथ योजनेला देशभरातून विरोध सुरू आहे. काही दिवसांपूर्वी या योजनेविरोधात विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत ही अग्निपथ योजना रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात पुढच्या आठवड्यात सुनावणी होणार आहे. यासंदर्भात बोलताना याचिकाकर्त्यांचे वकील एम एल शर्मा यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आम्ही केंद्र सरकारने काढलेल्या अग्निपथ योजनेची नोटीफिकेशन रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली आहे. सरकार नवीन योजना आणू शकतात. मात्र, ती चुकीची की बरोबर, ते सरकारने तपासले पाहिजे. गेल्या महिन्यात केंद्र सरकारने सैन्य भरतीसाठी अग्निपथ ही योजना सुरू केली होती. हा ऐतिहासीक निर्णय असल्याचे सरकारच्यावतीने सांगण्यात आले होते. मात्र, योजनेला विद्यार्थ्यांकडून विरोध होताना दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना विरोध बघता वयोमर्यादेतदेखील वाढ करण्यात आली होती. मात्र, तरीही या योजनेविरोधात देशातभरात विद्यार्थ्यांकडून हिंसक आंदोलनं करण्यात आली.

एकीकेड या योजनेला विरोध होत असला, तरी दुसरीकडे तिन्ही सेना प्रमुखांनी पत्रकार परिषद घेत ‘अग्निपथ’ योजना रद्द होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. तसेच लवकरच या योजनेंतर्गत भरती प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती दिली होती. तसेच भरती अगोदर युवकांना हिंसा आणि तोडफोडीत सहभागी नसल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक असल्याचेही लष्कराकडून स्पष्ट करण्यात आले होते.

## अशोक चव्हाणांना शिंदे सरकारचा दणका

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** राज्यात राजकीय अस्थिरता असताना शासनाच्या तिजोरीवर डोळा ठेवून अत्यंत घाईघाईने नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत कोट्यावधी रुपयांच्या तरतुदीला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ज्या कामाला मंजुरी देण्यात आली आणि जी तरतूद करण्यात आली त्या कामांना आणि त्या तरतुदीस स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नांदेडचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानंतर चिखलीकर यांच्या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी नांदेड डीपीडीसीच्या कामांना आणि बैठकीला तूर्तास स्थगिती दिली आहे.

नव्या पालकमंत्र्याची नियुक्ती होऊन त्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीतच डीपीडीसीच्या कामांना आणि तरतुदींना मंजुरी द्यावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत. त्यामुळे माजी पालकमंत्री अशोक चव्हाण यांनी घाई गडबडीत उरकलेल्या डीपीडीसीच्या बैठकीवर अखेर स्थागिती मिळाली आहे.

जिल्ह्याच्या विविध विकास कामांसाठी सन २०२१-२२च्या जिल्हा वार्षिक योजनांसाठी मार्च २०२२ अखेर एकूण ५६७.८ कोटी रुपयाची तरतूद मंजूर होती. या मंजूर तरतुदीपैकी ५६७.८ कोटी निधी प्राप्त झाला असून त्यापैकी ५६६.५१ कोटी विविध विकास योजनेअंतर्गत पुनर्विनियोजनाने सुधारित तरतुदीनुसार विकास कामांवर खर्च झाले. या खर्चास पालकमंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या नांदेड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती.

जिल्हा वार्षिक योजनेत सर्वसाधारण योजनेसाठी ३५५ कोटींची तरतूद मंजूर होती. यापैकी मार्च २०२२ अखेरपर्यंत ३५४ कोटी ४७ लाख ९० हजार खर्च झाले. खर्चाचे हे प्रमाण ९९.८५ टक्के एवढे आहे. अनुसूचित जाती उपयोजनासाठी १६३ कोटी रुपये मंजूर होते. यातील १६२ कोटी ९५ लाख एवढा निधी खर्च झाला. आदिवासी उपयोजनेमध्ये ४९ कोटी ७ लाख ९७ हजार एवढी तरतूद मंजूर होती. हा संपूर्ण निधी विकास कामांवर खर्च झाला असे सांगण्यात आले. मार्च २०२२ अखेर पर्यंत एकूण ५६६ कोटी ५० लाख ८७ हजार एवढा निधी खर्च झाला असेही नमूद करण्यात आले होते.

## बस दरीत कोसळून भीषण अपघात, विद्यार्थ्यांसह १६ जणांचा दुर्दैवी मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**कुल्लू :** हिमाचल प्रदेशयेथील कुल्लू येथे भीषण घटना घडली आहे. सोमवारी सैज दरीत बस कोसळल्याचे वृत्त आहे. या बसमध्ये एकूण ४५ प्रवासी होते. यातील १६ जणांचा मृत्य झाला आहे. मृतांमध्ये शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. सैंज घाटीतून शैंशर शहराकडे ही बस येत होती. याच दरम्यान जंगला नावाच्या एका वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सटले आणि बस थेट दरीत कोसळली. ही खासगी बस होती. या बसमध्ये काही स्थानिक प्रवाशांसह शाळेतील विद्यार्थी होते ते सैंज येथे शाळेत जात होते. कुल्लूचे एसपी गुरुदेव शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, बसच्या अपघाताविषयी कळताच पोलिसांचे दोन पथकं तातडीने रवाना केले आहेत.

अपघात झालेले ठिकाण हे दुर्गम क्षेत्र असल्याचं बोलले जाते. बस खोल दरीत कोसळल्याने बस पूर्ण चक्काचूर झाली आहे. पोलिस व जिल्हाधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. बस अपघाताची तीव्रता मोठी असल्याने बस नुकसान झाले असून बसच्या खाली किती जण दबले गेले आहेत, याची अद्याप सविस्तर माहिती समोर आली नाहीये. स्थानिक प्रशासनाने मृतांचा आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली आहे.

**पंतप्रधान मोदींचे ट्वीट**

हिमाचल प्रदेशमध्ये झालेल्या बस अपघाताच्या दुर्घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक ट्विट केलं आहे. या दुखःदप्रसंगी मी तुमच्यासोबत आहे. जे या दुर्घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. ते लवकरच पूर्ण बरे होतीस, अशी मी आशा व्यक्त करतो. स्थानिक प्रशासन जखमी झालेल्या प्रवाशांची मदत करत आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तसंच, या अपघातात जीव गमावणाऱ्या प्रवाशांसाठी पंतप्रधानांनी २ लाखांची आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. तर, जखमींना ५० हजारांची मदत जाहीर केली आहे.

## कोल्हापुरात मुसळधार पाऊस

### पंचगंगा नदीच्या पातळीत झपाट्याने वाढ

आधुनिक केसरी न्यूज

कोल्हापूर : जुलै महिना सुरु झाल्यापासून राज्यात पावसाने चांगला जोर धरल्याचे दिसत आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यामुळे पंचगंगा नदीच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ लागली आहे. गेल्या सात तासांमध्ये पंचगंगा नदीची पातळी ७ फुटांनी वाढली आहे. तर राजाराम बंधारा येथील पाण्याची पातळी २४ फुटांवर जाऊन पोहोचली आहे. आतापर्यंत सहा बंधारे पाण्याखाली गेल्याने वाहतुकीस बंद ठेवण्यात आले आहेत. पंचगंगा नदीची इशारा पातळी ३९ फूट इतकी आहे, तर धोका पातळी ४३ फूट इतकी आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाकडून सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत.


रविवारी रात्री सुरू झालेल्या पावसाने एक क्षण ही विश्रांती घेतली नसल्याने बाहेर पडणाऱ्या नागरिकांना रेनकोट आणि छत्रीचा आधार घ्यावा लागत आहे.तर दुसऱ्या बाजूला धरण क्षेत्रामध्ये ही मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्याने राधानगरी धरणातून ही पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे.गेल्या सात तासांमध्येच राजाराम बंधाऱ्याची पाणी पातळी ७ फुटांनी वाढ झाल्याने यंत्रणा देखील हायअलर्टवर गेली आहे.

यापूर्वी तीनवेळा महापुराचा सामना केलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात पुन्हा एकदा पुरसदृश्य स्थिती निर्माण होत आहे. कारण गेल्या दोन ते तीन दिवसापासून सुरू असलेल्या पावसाने काल सोमवार सकाळपासून कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात पावसाने जोर धरला आहे. धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने राधानगरी धरणातून क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे पंचगंगा पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असून गेल्या ७२ तासात ६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तर कसबा बावडा येथील राजाराम बंधाऱ्याच्या पाणी पातळीत ही झपाट्याने वाढ झाली असून काल रात्रीच्या आठ वाजताच्या



सुमारास हा बंधारा देखील पाण्याखाली गेला. आज सकाळी येथील पाणी पातळी २४ फुटांवर गेली आहे. पंचगंगा नदीची इशारा पातळी ३९ फूट आहे तर धोका पातळी ४३ फूट इतकी आहे.पंचगंगा नदीच्या पाणी पातळी झपाटाने होणारी वाट पाहता प्रशासन सध्या हाय अलर्ट वर केली असून प्रशासनाकडून तत्काळ हा बंधारा वाहतुकीसाठी बंद केला करण्यात आला आहे.

दरम्यान हवामान खात्याकडून आठ जुलै पर्यंत अतिवृष्टीचा इशारा दिल्याने जिल्हा प्रशासन सतर्क झाली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागासह सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत तसेच आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधण्यासाठी टोल फ्री क्रमांकसह दूरध्वनी क्रमांक जारी करण्यात आले आहेत. नागरिकांना काही आपत्ती आल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. टोल फ्री क्रमांक १०७७ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग: ०२३१-२६५९२३२, २६५२९५०, २६५२९५३, २६५२९५४




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# आनंद आणि उत्साहमूर्ती : श्री गुरुमूर्ती सर

एवढा प्रवास, पैसे आणि वेळ खर्चून कसे येऊ शकतात हे ? तुमच्या ;मनात आला असेल तोच विचार माझ्याही मनात आला. आपल्या मनात येणारा पहिला विचार म्हणजे ' यांना काही फारसे काम नसेल. रिकामा वेळ भरपूर मिळत असेल. खर्च करण्यासाठी पैसा पण मुबलक असेल. ' पण माझ्या या सर्व कल्पना, हे विचार अनुभवांती खोटे ठरले. जसजसे आम्ही एकमेकांच्या अधिकाधिक जवळ येत गेलो, तसतसा हा माणूस, त्याच्या मनाचा मोठेपणा, उमदेपणा लक्षात येत गेला आणि मग त्यांच्याबद्दलचा आदर शतपटींनी वाढला.

आम्ही आमच्या कर्नाटकातील बदामी येथे असलेल्या आमच्या कुलदेवतेचे म्हणजे शाकंभरी देवीचे दर्शन घेण्यासाठी नुकतेच गेलो होतो. गुरुमूर्ती सर आम्हाला अनेक वर्षांपासून बोलवत असल्याने यावेळी आम्ही त्यांच्याकडेही जायचे ठरवले होते. आम्ही बदामी येथे शाकंभरी देवीचे दर्शन घेऊन बाहेर पडत नाही तोच गुरुमूर्ती सर आम्हाला होस्पेट येथे नेण्यासाठी त्यांचा मुलगा तेजस यांच्यासह हजर झाले. मी, माझी सौभाग्यवती, माझी मुलगी आणि नातू असे आम्ही चौघे त्यांच्याकडे दोन दिवस राहिलो. सोबत एक दिवस आमचे जावई होते परंतु रजेअभावी त्यांना जास्त थांबता आले नाही.

पाहताक्षणीच आपलेसे वाटावे असे प्रेमळ गुरुमूर्ती सरांचे व्यक्तिमत्व. मध्यम उंची, प्रमाणबद्ध असलेले शरीर, चेहऱ्यावर तेज आणि कायम मंद स्मित. वय साधारणपणे ५५ च्या आसपास असणाऱ्या या माणसाची मातृभाषा जरी कानडी असली तरी तामिळ, तेलगू, मल्याळी, हिंदी, इंग्रजी अशा पाच सहा भाषांवर प्रभुत्व. मराठी जरी सफाईदारपणे बोलता येत नसले तरी बोललेले मराठी सहज समजू शकतात. वाचनाची त्यांना अतिशय आवड आहे. स्वच्छतेची अतिशय आवड असलेले गुरुमूर्ती सर मनाने सुद्धा अंतर्बाह्य निर्मळ आहेत. मुलात मूल होऊन ते खेळतात.

सरांचा दिवस पहाटे साडेचार वाजता सुरु होतो. प्राणायाम, योगासने आणि ध्यानधारणेने त्यांच्या दिवसाची सुरुवात होते. देवपूजा, घराची बागेची स्वच्छता ते स्वतःच करतात. सरांचे घर म्हणजे एक अतिशय प्रशस्त आणि सुदंर बंगला आहे. ' श्रीकृष्ण ' असे नाव दिलेल्या त्यांच्या बंगल्यात एक प्रशस्त हॉल आहे. प्रशस्त स्वयंपाकघर, स्वतंत्र आणि अत्यंत सुंदर अशी देवघराची स्वतंत्र खोली, दोन शयनकक्ष, त्यांच्या एका शयनगृहात नित्य वाचनाची पुस्तके, खाली तळघरात आणखी एक सुंदर खोली जिला ते ध्यानगृह असं म्हणतात. वरच्या मजल्यावर पुन्हा एक विशाल आणि अत्याधुनिक शयनगृह, एक वाचनालय आणि चित्रपट किंवा **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### अभ्यास कौशल्ये विकसित करावीत

आधुनिक केसरी

शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी प्रत्येकाच्या यशासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक असते. शिक्षणामुळे प्रत्येकाच्याच जीवनातील आव्हाने कमी होतात. आपण जितके अधिक ज्ञान मिळवू तितक्या अधिक संधी आपल्याला करिअर आणि वैयक्तिक वाढीच्या दृष्टीने प्राप्त करण्यास अनुमती मिळत असते. शिक्षण महत्वाचे असल्याचे अजून एक महत्वाचे कारण म्हणजे ते आपल्याला जीवनाकडे पाहण्याचा एक अद्वितीय दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करते. हे लोकांना चांगले नागरिक बनण्यास, चांगल्या पगाराची नोकरी मिळविण्यात मदत करते, चांगले आणि वाईट मधील फरक दर्शवते. शिक्षण आपल्याला कठोर परिश्रमाचे महत्त्व दर्शवते आणि त्याच वेळी, आपल्याला वाढण्यास आणि विकसित करण्यास मदत करते. चांगली अभ्यास कौशल्ये आपला आत्मविश्वास, क्षमता आणि आत्मसन्मान वाढवू शकतात. ते चाचण्या आणि मुदतीबद्दलची चिंता देखील कमी करू शकतात. प्रभावी अभ्यास कौशल्ये विकसित करून, आपण अभ्यासात घालवलेल्या तासांची संख्या कमी करू शकतो, आपल्या आयुष्यातील इतर गोष्टींसाठी जास्त वेळ काढू शकतो. लैंगिक असमानता दूर करण्यासाठी, गरिबी कमी करण्यासाठी, शाश्वत जीवन तयार करण्यासाठी, अनावश्यक मृत्यू आणि आजारांना प्रतिबंध करण्यासाठी आणि शांतता वाढवण्यासाठी शिक्षण ही गुरुकिल्ली असते. ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेत, शिक्षण हे नवीन चलन आहे ज्याद्वारे राष्ट्रे आर्थिक स्पर्धात्मकता आणि जागतिक समृद्धी राखू शकतात. राजकीय, आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि सांस्कृतिक आकांक्षा साध्य करण्याच्या उद्देशाने एखाद्या राष्ट्राला केवळ शिक्षित करणेच नव्हे, तर वैयक्तिक ज्ञानातही वाढ झाल्याने राष्ट्रीय विकासाला चालना मिळते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### वेदना जन्माची | मुक्त झाली ||

तन मन आता | माझे न राहिले ||
एकरूप झाले | चरणासी ||१||

रमता न आले | स्वार्थाच्या बाजारी ||
माझी मी पायरी | ओळखली ||२||

येता मी शरण | तुला पांडुरंगा ||
ब्रह्मानंदी गंगा | खळाळली ||३||

आता नाही चिंता | त्रिगुण तापाची ||
वेदना जन्माची | मुक्त झाली ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी

**नमस्यामो देवान्ननु हतविधेऽस्तेऽपि वशगा**
**विधिर्वन्द्यः सोऽपि प्रतिनियतकर्मैकफलदः।**
**फलं कर्मायत्तं यदि किममरैः किञ्च विधिना**
**नमस्तत्कर्मभ्यो विधिरपि न येभ्यः प्रभवति ।।**

**अर्थ :** आम्ही देवांना प्रणाम करतो, परन्तु ते दुष्ट विधात्याच्या वश आहेत. विधात्याला वंदनीय मानले, तर ते आम्हाला आमच्याच कर्माची फळे देणारे आहेत. जर फळ कर्मानुसारच प्राप्त होते, तर विधाता किंवा देवांशी काय प्रयोजन? ज्याला विधाता देखील प्रभावित करू शकत नाहीत, त्या कर्मासच नमस्कार आहे. या श्लोकात भर्तृहरींनी कर्माच्या भूमिकेचे श्रेष्ठत्व स्पष्ट केले आहे. जर कर्मानुसार फळ मिळणार असेल, तर कर्मच श्रेष्ठ होय अशी भूमिका येथे भर्तृहरींनी मांडली आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## देह हा देवाच्या प्राप्तीकरता आहे



आधुनिक केसरी

एकदा असे झाले, की एका साधूकडे चोरांनी चोरी केले. ते पळून जात असताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा चोरांना धरून त्या शिष्यांनी खूप चोप दिला. हे त्यांचे करणे गुरूला समजले, तेव्हा त्या चोरांना आणून, गुरूने त्यांच्या अंगाला तेल वगैरे लावून स्नान घातले, आणि त्यांना पंचपक्वान्नांचे भोजन दिले. हे असे काय करता ? म्हणून शिष्यांनी गुरूला विचारले, तेव्हा त्याने शिष्यांना सांगितले की, "तुम्ही तरी काय करता? सर्वचजण देवाच्या घरी चोरी करीत आहेत; कारण आपल्याला त्याने हा जो देह दिला तो देवाची प्राप्ती करून घेण्याकरिता म्हणून दिला, परंतु आपण ते न करता त्याच्यापासून विषय चोरतो आहोच की नाही ! म्हणून, विषयात आसक्ति न ठेवता आपण मनापासून देवाची भक्ति करावी. आपण सर्वांनी 'मी भगवंताकरिता आहे' असे मनाने समजावे. सर्व ठिकाणी भगवंतच भरलेला आहे अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर, मग द्वैत आपोआप नाहिसे होऊन जी एकाग्रता साधते, तीच खरी समाधी होय. संत काय करतात? आपण चुकीची वाट चालत असताना, 'अरे, तू वाट चुकलास' अशी जागृती आपल्याला देतात आणि खरा मार्ग दाखवितात. ते सदासर्वदा समाधिसुख भोगीत असतात, आणि नेहमी भगवंताविषयी सांगत असतात. भगवंताच्या लीला पाहणार्यांनाच खरा आनंद मिळतो. आपण एक दाणा शेतात पेरावा आणि त्याबद्दल हजार दाणे घ्यावे, ही भगवंताची लीला आहे. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. जसा मारुतीमध्ये देव-अंश होता, तसा तो आपल्यामध्येही आहे. त्याने तो फुलविला, आपण तो झाकून विझवून टाकला. मारुतीचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवावे. त्याचे ब्रह्मचर्य, भक्ति, दास्य आणि परोपकार करण्याची तऱ्हा या गोष्टी आपण शिकाव्यात. मारुती हा चिरंजीव आहे. ज्याची तशी भावना असेल त्याला अजूनही त्याचे दर्शन होईल. मारुतीला सर्व सृष्टी रामरूप दिसली. हेच खरे भक्तिचे फळ आहे. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्ती मध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. 'माझ्या देवाला हे आवडेल का ?' अशा भावनेने जगात वागावे. हाच सगुणोपासनेचा मुख्य हेतू आहे. भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझे कल्याण करणारा आहे, ही जाणीव झाली, की जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेने मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मिळेल. समाधान आणि आनंद हीच खरी लक्ष्मी होय. आपली वृत्ती अशी असावी की, कुणाला आनंद पाहिजे असेल तर त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ती कितीही दिली तरी पुरी पडत नाही,पण वृत्तीचा आनंद देऊन कधीच संपत नाही.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

## रंग वारीचे

आधुनिक केसरी

रंगा शेठजींनी वारीसाठी भलं मोठं हॉटेल थाटलं... खाण्यापिण्याच्या सामानानं गच्च भरलं... या बसा म्हणायला चार माणसं ठेवली... वारीत हौशै, गौशे, नवशे सर्व काही पॅटर्न सापडतात... पण श्रीमंत, गरीब असा भेदाभेद भुकेला नसतो... अन्नम् ब्रह्मेती हे ज्याला कळलं त्याला अन्नपूर्णा नेहमीच प्रसन्न होते... दुपारचे दोन वाजत आले होते. पोटात भुकेने जीव कासावीस झाला होता. गरीब फाटक्या कपड्यातलासुदामाला पाहून त्याच्याकडं दुर्लक्ष केले. सुदामा आणि त्याचं पोरं जेवायला बसले. तेवढ्यात एक गाय गर्दीत घुसून पळू लागली. इतस्ततः गर्दी पांगली. माणसं आधाराला, आसऱ्याला जागा शोधू लागली. पंधरा-सोळा जण शेठजींच्या हॉटेलात घुसली. चला चांगली कमाई होईल या आशेने डोळे लुकलकले. पणती माणसं नेमकी पैशानं गरीब होती हे त्यांच्या चेहऱ्यावर लक्षात येत



होतं. जेवणाची नेमकी वेळ होती सगळ्यांना खूप भूक लागली होती हे चेहऱ्यावरून कळत होतं. कांऊटरवरच्या शेठजींनी कटाक्ष टाकला. लाजकाजं सगळ्यांना बसायला सांगितलं. तेवढ्यात सुदामा उठला आणि म्हणाला बसा रं जेवायला, पोटभर जेवा, बिल मी देतो. सगळे पोटभर जेवले. सुदामा बिल द्यायला काऊंटर गेला बिलाचा आकडा पाहून खिसा चाचपला. ते बघून शेठजी म्हणाले असू द्या चारच जणांचे पैसे द्या. तुमची पण श्रीमंती ऊतू जात नाही हे मला मगाशीच लक्षात आले. मला आज नफा झाला नाही असे मी मानेन. पण तुमच्यातल्या दानतेला सलाम. नफा काय आज कमी उद्या जास्त. पांडुरंगाच्या मनात आले तर डबल होईल असे म्हणाले. सुदामाने पण चारच्या ऐवजी सहा जणांचे पैसे दिले. त्यांनंतर सात वाजता चार मोठ्यागाड्यांमधूनपन्नास-साठ माणसं जेवायला आली आणि शेठजींचा भरभरून नफा करून गेली...

**-सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर**

# बारा मजली फूड-प्लाझा 1100 वाहनांच्या पार्किंग व्यवस्थेसह उभारण्यात येणार

## केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूरच्या प्रसिद्ध फुटाळा तलावात असणारे संगीत कारंजे नागपूरचा इतिहास सांगणार असून या इतिहासाची हिंदी मधली कॉमेंट्री अमिताभ बच्चन यांच्या आवाजात तर मराठीतली कॉमेंट्री नाना पाटेकर यांच्या आवाजात राहील. हे कारंजे पाहण्यासाठी फुटाळा तलावाजवळ दर्शक गॅलरी ही 400 आसन क्षमतेची राहणार असून फुटाळ्याच्या पुढेच बारा मजली फूड-प्लाझा 1100 वाहनांच्या पार्किंग व्यवस्थेसह उभारण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज नागपूर मध्ये दिली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आणि नागपूरच्या सौंदर्यात



भर घालणाऱ्या फुटाळा म्युझिकल फाऊंटन आणि लाईट-शो प्रकल्पाची उद्घाटनापूर्वी आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर शहरातील गणमान्य व्यक्ती व अधिकाऱ्यांसह पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय रस्ते निधी मधून 30 कोटी रुपये पंजाबराव कृषी विद्यापीठाला देण्यात आले असून फुटाळ्याजवळील विद्यापीठ उद्यानात देश-विदेशातील पुष्पांच्या जाती आणून येथील पुष्पविविधता वाढवण्यात येणार आहे, अशी माहिती सुद्धा त्यांनी दिली. या कारंजाच्या निर्मिती साठी विश्वस्तरावरील आर्किटेक्ट नागपूरात आले असून फाऊंटनच्या हार्डवेअरची प्राथमिक चाचणी आज गडकरी यांनी बघितली आणि पाहणी केली. या फाऊंटेनच्या निर्मितीसाठी हातभार लावणारे नागपूर सुधार प्रन्यास, महामेट्रो तसेच या प्रकल्पाचे कंत्राटदार यांचेही आभार गडकरी यांनी मानले. याप्रसंगी उपस्थित तामिळ फिल्म क्षेत्रातील गायिका रेवती यांनी सुद्धा या प्रकल्पाच्या संगीत नियोजना विषयी माहिती दिली.

## अमरावतीत आंतरराष्ट्रीय धनुर्विद्यापटू घडताहेत : पवन तांबट

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** धनुर्विद्या क्रीडा प्रकाराच्या प्रसाराला अमरावतीची क्रीडाभूमी अनुकूल असून, येथील विविध क्रीडा संस्थांच्या प्रशिक्षणातून अनेक धनुर्विद्यापटू घडत आहेत व देशपातळीवर पोहोचत आहेत, असे महसूल सेवेत तलाठी पदावर कार्यरत असलेले, राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक पवन तांबट यांनी आज सांगितले.

तांबट यांची दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया येथे होणा-या 'आर्चरी वर्ल्डकप'च्या चौथ्या टप्प्यासाठी भारताचे क्रीडा प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे. अमरावतीची मधुरा धामणगावकर ही विद्यार्थिनीही याच स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे. श्री. तांबट यांनी यापूर्वी 2016 मध्ये थायलंड येथे 'आशिया कप'मध्ये, तर 2019 मध्ये स्पेनमधील माद्रिद येथे जागतिक युवा धनुर्विद्या स्पर्धेत भारतातर्फे क्रीडा प्रशिक्षक म्हणून सहभाग घेतला आहे. ते महसूल सेवेत तलाठी पदावर कार्यरत आहेत.

अमरावतीतील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातून प्रमोद चांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण प्रशिक्षण घेतले असून, राष्ट्रीय पातळीवर 14 व राज्यस्तरावर 35 पदके मिळवली आहेत. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळासारख्या नामांकित संस्था, ठिकठिकाणी कार्यरत विविध प्रशिक्षण संस्था, विभागीय क्रीडा संकुल व इतर संकुले यामुळे अमरावतीत धनुर्विद्या क्रीडा प्रसाराला अनुकूल वातावरण आहे. मी स्वतःही गुरूकुल धनुर्विद्या अकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहे, असे श्री. तांबट यांनी सांगितले.




## वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनतर्फे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आज पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसीएशन व वन विभाग नसरापूर यास मार्फत वृक्ष रोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. कामथडी व खोपी गावामधे मिळून पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असो.चे अध्यक्ष सुशील विभुते, व सदस्य सर्पमित्र विशाल शिंदे, सनी कडके, स्वप्नील शिंदे, साहिल गुतेदार, राहुल मालुसरे, उषा लोहार व सोनु खेडेकर, तसेच नसरापूर वन विभागाचे वनरक्षक तांबे, वनरक्षक पगडे, कोरके, लेखापाल लक्ष्मण शिंदे, व वनमजुर यांनी मिळून आज 500 वृक्ष रोपण करण्यात आले व सर्पमित्र सुशील विभुते यांनी सर्व सर्पमित्रांना व लोकांना झाडें का लावावी ही माहिती पुढील प्रमाणे झाडे लावणे खूप महत्वाचे आहे कारण आपले जीवन झाडांवर अवलंबून आहे. झाडे आपल्याला फळे, फुले, लाकूड अशा अनेक गोष्टी देतात. आपल्या सर्वांसाठी आणि मानवांसाठी वृक्ष हे एक नैसर्गिक वरदान आहे कारण झाडे पृथ्वीवरील आपल्या सर्व प्राण्यांना ऑक्सिजन देतात.

काटेरी झुडपे अधिकाधिक वाढत आहेत, ज्यामुळे पृथ्वीचे पर्यावरण आणि वातावरणाचा समतोल बिघडत आहे.

झाडे आपल्या सर्वांसाठी खूप महत्वाचे आहेत, आपण सर्व प्रकारे झाडांची सेवा करतो. आम्हाला फुले आणि लाकूड पुरवण्याव्यतिरिक्त, ते थंड वारे आणि उन्हाळ्यात सावली देखील देतात. झाडे लावल्याने आपल्या वातावरणातील ग्लोबल वार्मिंग कमी होईल कारण त्यातून निघणारा शुद्ध ऑक्सिजन आपल्या वातावरणात प्रवेश करेल, ज्यामुळे कार्बन डायऑक्साइड वायूचे प्रमाण कमी होईल.

झाडे लावल्याने मानव आणि इतर प्राण्यांना अनेक फायदे होतात. आपल्या देशातील वायू प्रदूषण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे आपल्या सर्वांना स्वच्छ हवेत श्वास घेण्यासाठी पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही, ज्यामुळे अनेकांना श्वास घेणे कठीण होते. आपण वृक्षारोपण करुण सर्व प्राण्यांना पुरेसा ऑक्सिजन देऊ, आपल्या देशात वायू प्रदूषण इतक्या वेगाने पसरत आहे की अनेक लोकांना श्वसन समस्या, दमा यासारख्या आजारांनी ग्रासले आहे आणि ते खूप वेगाने वाढत आहे.

झाडे लावल्याने आपल्याला शुद्ध फुले आणि शुद्ध ऑक्सिजन आणि लाकूड मिळते. झाडांच्या लाकडाचा वापर घरे बांधण्यासाठी केला जातो आणि ग्रामीण भागात या लाकडाचा वापर अन्न बनवण्यासाठी केला जातो. अनेक पक्षी झाडांवर घरटी बांधून त्यावर राहतात. तुम्ही एखादे झाड लावले तर ते अनेक पक्ष्यांना घर देईल. पक्ष्यांबरोबरच झाडेही आपल्याला सावली देतात. जेव्हा आपण उन्हाळ्याच्या कडक उन्हाचा अनुभव घेतो तेव्हा आपण झाडांच्या थंड सावलीत विश्रांती घेतो. उन्हाळ्यात अनेक मुले झाडावर खेळतात.झाडे ही पृथ्वीवरील आपल्या सर्वांनानिसर्गाचीदेणगी आहे. झाडांमुळे, आपल्या सर्वांना सर्व प्राण्यांसाठी अनेक फायदे आहेत. ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषण पृथ्वीवर इतक्या वेगाने पसरत आहे की त्यामुळे अनेक लोकांसाठी अनेक समस्या निर्माण होत आहेत.या समस्या टाळायच्या असतील तर आपण सर्वांनी झाडे लावणे गरजेचे आहे. झाड लावणे म्हणजे झाड लावणे. आपण पृथ्वीवर जितकी जास्त झाडे लावू तितका जास्त ऑक्सिजन आपल्याला मिळेल आणि आपण सहज श्वास घेऊ शकू.

## स्वा.रा.ती.तील वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.प्रशांत देशपांडे यांना प्रोफेसर म्हणून पदोन्नती

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या नाक-कान-घसा विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख यांची वैद्यकीय शिक्षण संशोधन व संचनालय विभागाने प्रोफेसर म्हणून पदोन्नती केली असल्याचे आदेश काढले आहेत.

लातुर जिल्ह्यातील अहमदपुर तालुक्यातील हिप्परगा येथील मुळ रहिवासी असलेल्या डॉ. प्रशांत देशपांडे-हिप्परगेकर यांचे वैद्यकीय शिक्षण औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे झाले, तर पदव्युत्तर शिक्षण अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती.वैद्यकीय महाविद्यालयात पुर्ण केले. पदव्युत्तर शिक्षणानंतर डॉ. प्रशांत देशपांडे हे अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नाक-कान-घसा विभागात लेक्चरर, सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आता कालच्या आदेशानुसार ते प्रोफेसर झाले असून आपल्या कार्याने अशा पद्धतीने त्यांचा चढत्या क्रमाने प्रवास सुरूच आहे.

**अत्यंत संयमी-मितभाषी-बुद्धीमान आणि शिस्तबद्ध असणारे डॉ.देशपांडे हे ENT चे महाराष्ट्रातील ऐक नामवंत डॉक्टर**

डॉ.प्रशांत देशपांडे हे नाक-कान-घसा विभागातील महाराष्ट्रातील मोजक्या चांगल्या सर्जन पैकी एक नामांकित डॉक्टर आहेत. नाक-कान-घसा विभागाशी निगडित असलेल्या अत्यंत अवघड शस्त्रक्रिया ते अत्यंत सहजतेने आणि कौशल्याने यशस्वी करतात. कोवीड काळात डॉ. प्रशांत



देशपांडे यांचे योगदान खुप मोठे आहे. कोवीड नंतर आलेल्या म्युकर मायक्रोसीस या आजारामधील नाक-कान आणि घशात बुरशी येण्याच्या आजारांवर अनेक अवघड शस्त्रक्रिया त्यांनी पुर्ण करुन अनेकांना जीवदान मिळवून दिले आहे.

**अभिनंदनाचा वर्षाव**

डॉ. प्रशांत देशपांडे यांच्या पदोन्नती बद्दल त्यांचे स्वा.रा.ती. चे अधिष्ठाता तथा ऐक नामांकित नेत्ररोग तज्ञ असलेल्या डॉ.भास्कर खैरे, आ. नमिता मुंदडा, मेडिसीन विभाग प्रमुख डॉ. सिध्देश्वर बिराजदार, माजी आमदार संजय दौंड, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, माजी आमदार पृथ्वीराज साठे, नामवंत सर्जरी विभाग प्रमुख डॉ.नितीन चाटे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## धुळे व्यापारी महासंघाची निदर्शने



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पॅकींग अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटी आकारणी केली जाणार असून केंद्राचा हा निर्णय छोटया व्यापाऱ्यांना मारक ठरणार आहे त्यामुळे हा जीएसटी रद्द करावा, अशी मागणी व्यापारी महासंघाने केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात धुळे व्यापारी महासंघाने म्हटले आहे की, सतत वाढत असलेल्या महागाईच्या वाढत्या आलेखात आता अजून भर पडणार आहे. सर्वसाधारण नागरीकांच्या दैनंदिन वापराच्या धान्यावर केंद्र शासन आता ५ टक्के जीएसटीची आकारणी करणार आहे, असे नुकतेच जाहीर झाले आहे. पूर्वी ब्रॅण्डेड पॅकींगच्या अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटीची आकारणी केली जात होती. पण आता सर्वच पॅकींगच्या अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटीची आकारणी केली जाणार आहे केंद्राचा हा निर्णय छोटया व्यापाऱ्यांना मारक ठरणार आहे. व्यापारी वर्गाला अजून नवीन कराचा भार सहन करावा लागणार आहे. यासाठी नव्याने कर सल्लागार, अकाउंटंट व संगणकाचा खर्च वाढणार आहे. त्याबरोबरच सर्वसामान्य नागरीकांनाही ज्यादा पैसे मोजावे लागणार आहे यावाढीव करामुळे सामान्यांचे बजेट चुकणार आहे. अन्नवस्त्र निवारा या मुलभुत गरजांना किमान व्यापारी वर्गाच्यावतीने महासंघाचे करकक्षातून दुर ठेवावे अशी मागणी अध्यक्ष नितीन बंग, अजय बरडीया, अनिल रुणवाल, झुल्फीखार अब्बास बोहरी, नंदु सोनार यांनी केले.



# डिजिटल व्यवहार

आधुनिक केसरी

ग्राहकांकडून वस्तू किंवा सेवा खरेदी करताना डेबिट किंवा क्रेडिट कार्डच्या माध्यमातून व्यवहार केला जातो. अशा वेळी ग्राहकाला त्याच्या बँकेचा आणि संबंधित कार्डाचा तपशील व्यापाऱ्याला द्यावा लागतो. मात्र व्यापाऱ्याकडून बँकेशी संबंधित गोपनीय माहिती गहाळ होऊ शकते आणि त्या माहितीच्या आधारे सायबर भामटे खात्यातील पैसे काढून घेऊ शकतात. यासाठी कार्डाशी संबंधित सर्व माहिती सुरक्षित राहावी यासाठी ती सांकेतिक पद्धतीने (टोकन) साठवली जाते. थोडक्यात टोकनीकरण म्हणजे कार्डाच्या मूळ तपशिलाला टोकनने बदलणे होय. रिझर्व्ह बँकेच्या मते, टोकनीकरण कार्ड व्यवहार अधिक सुरक्षित असतात. डिजिटल व्यवहार प्रक्रियेदरम्यान मूळ कार्ड तपशील व्यापाऱ्याला अवगत केला जात नाही. सध्या, ऑनलाइन धाटणीच्या कार्ड व्यवहारांमध्ये, व्यापाऱ्यांसह अनेक संस्थांकडून ग्राहकांच्या कार्डाचा तपशील अर्थात कार्ड क्रमांक, समाप्तीची तारीख वगैरे 'कार्ड-ऑन-फाइल' तपशील जतन करून ठेवला जातो. जेणेकरून भविष्यात व्यवहार करताना कार्डधारकांना हा तपशील पुन्हा नमूद करावा न लागता, सोयीस्करपणे व अल्पवेळेत व्यवहार मार्गी लावणे शक्य बनते. परंतु अनेक व्यापारी संस्थांकडे अशा तऱ्हेने कार्डाचा तपशील असल्यामुळे तो चोरला जाण्याची अथवा त्याचा दुरुपयोग होण्याचा धोकाही वाढतो. शिवाय व्यापाऱ्यांकडूनच साठविलेल्या अशा तपशिलाबाबत हयगय आणि गैरवापर झाल्याची आणि कार्डधारकांना त्यातून मोठे आर्थिक नुकसान झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे कार्ड वितरण जाळे आणि कार्ड जारीकर्त्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थेस कार्डाचा तपशील जतन करता येणार नाही, असे निर्देश रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. तसेच व्यापारी व देयक व्यवहार मंचांना कार्डचे सर्व तपशील हटवून, ग्राहकांच्या संमतीने ते 'टोकन'रूपात बदलून घ्यावे लागणार आहेत. क्रेडिट आणि डेबिट कार्डधारकांना त्यांच्या कार्डाचे चिन्हांकन अर्थात टोकनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आणखी तीन महिन्यांचा कालावधी देऊ केला आहे. कार्ड टोकनीकरणाची अंतिम मुदत तीन महिने पुढे म्हणजे ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत वाढविण्याचा निर्णय शुक्रवारी तिने जाहीर केला. या प्रक्रियेला दिली गेलेली ही तिसरी मुदतवाढ असून, मध्यवर्ती बँकेने त्यासाठी ३० जून ही अंतिम मुदत निश्चित केली होती. व्यापारी व देयक व्यवहार मंचांना कार्डाचे सर्व तपशील हटवून, ग्राहकांच्या संमतीने ते टोकन रूपात बदलून घ्यावे लागण्याच्या या प्रक्रियेला मुदतवाढीची कारणमीमांसा रिझर्व्ह बँकेने नुकतीच केली आहे. विशिष्ट प्रकारच्या व्यवहारांच्या संदर्भात नव्या आदेशाच्या अंमलबजावणीशी संबंधित समस्यांकडे उद्योग क्षेत्राकडून लक्ष वेधण्यात आल्याचे तिने म्हटले आहे. तसेच, टोकन वापरून प्रक्रिया केलेल्या व्यवहारांची संख्या व्यापाऱ्यांच्या सर्व श्रेणींकडून अद्याप प्राप्त झालेली नाही, असे उद्योग क्षेत्राकडून सूचित केले गेले आहे. या समस्यांची दखल घेऊन त्यासंबंधी सर्व भागधारकांशी सल्लामसलत करून त्यांचे निराकरण केले जात असल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. हा विस्तारित कालावधी व्यापारी संस्था व देयक उद्योगाद्वारे, टोकनीकृत व्यवहार हाताळण्यासाठी सर्व भागीदारांची सज्जता करण्यासाठी, टोकन-आधारित व्यवहारावर प्रक्रिया आखण्यासाठी, तसेच कार्डधारकांमध्ये जनजागृतीसाठी वापरात येईल, असा विश्वास रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे. टोकनीकृत कार्डाची एक पर्यायी यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या दिशेने या काळात पावले टाकली जातील, असेही मध्यवर्ती बँकेला अपेक्षित आहे.



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

# देवेंद्र फडणवीसांवर अन्याय झाला का..?

आधुनिक केसरी

**पाच वर्षाची यशस्वी कारकीर्द फडणीस यांनी पूर्ण केली होती त्यांच्यावर कुठलाही भ्रष्टाचाराचा आरोप नव्हता तरुण तडफदार, कुशल संघटक आणि बुद्धिमान राजकारणी आणि प्रशासनावर योग्य असे नियंत्रण अशा सर्व बाबी त्यांच्याजवळ असताना त्यांचे बाबतीत असा अन्यायकारक निर्णय का घेतला गेला? असा प्रश्न साहजिकच संपूर्ण महाराष्ट्राला पडलेला आहे. अर्थात त्यांना दिलेला आदेश हा त्यांच्या अन्याय करणाराच आहे परंतु पक्ष आदेश म्हणून त्यांनी ते पद स्वीकारले अन्यथा मुख्यमंत्रीपदी निवड हेच योग्य होते.**

महाराष्ट्रात सत्तांतर झाले मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणीस आणि उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे असतील हाच विचार सर्व जनतेच्या मनात होता. तसेच खुद्द एकनाथ शिंदे यांना सुद्धा जाहीर होईपर्यंत आपणाला मुख्यमंत्रीपद मिळेल याची अपेक्षा नव्हती परंतु अनपेक्षितपणे पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्री म्हणून नाव जाहीर केले आणि पक्षाकडून लगेच साडेसात वाजता अवघ्या एक ते दीड तासात कसा बदल झाला आणि देवेंद्र फडणीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यावी, उपमुख्यमंत्री पद स्वीकारावे असा आदेश पक्षश्रेष्ठीकडून म्हणजेच भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, अमित शहा यांनी जाहीर दिला. आदेश दिला त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट केले. अर्थात हा निर्णय आधिच ठरला असावा. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी फक्त एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्री नाव जाहीर करून आपण मात्र बाहेर मंत्रिमंडळाच्या कामकाजावर लक्ष ठेवणार असे म्हटले. मंडळ सामील होणार नाही असे म्हटले होते .अर्थातच फडणीस यांना स्वारस्य नव्हते हे स्पष्टच होते. कदाचित चंद्रकांत पाटलांनी ते स्वीकारले असते आणि प्रदेशाध्यक्षपद फडणीस यांनी घेतले असते किंवा त्यांना दिले असते तर ते अधिक उचित ठरले असते. एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांनी दाखवलेल्या मोठेपणाचे कौतुकच केले आणि मला ही अपेक्षाही नव्हती असे बोलले म्हटले. कारण देवेंद्र फडणीस यांनी आपल्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री पद निर्माण करायचे नव्हते आणि जाणून बुजून आता त्यांना ते देण्यात आले असे म्हटले तरी चालेल असे का व्हावे हा एक मोठा प्रश्न आहे.

या घटनेनंतर अनेक जणांच्या राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. आश्चर्य व्यक्त केले गेले, देवेंद्र फडणवीस यांना भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने उपमुख्यमंत्री पद दिले. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे केवळ नियंत्रण ठेवायचे तर ते चंद्रकांत पाटीलदेखील ठेवू शकले असते.चंद्रकांत पाटील अमित शहा यांच्या जवळचे आहेत आणि मागच्या मंत्रिमंडळात ते मुख्यमंत्र्यांसारखेच वागले असेदेखील त्यांनी म्हटले आहे. भाजपने शिवसेनेला संपवण्यासाठी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्याचा घाट घातला असे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे. तर देवेंद्र फडणीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांना वरून आलेला आदेश पाळावा लागला, असे शरद पवारनी म्हटले आहे. 39 आमदार घेऊन बाहेर पडणे हे साधी गोष्ट नाही आणि ती कुवत एकनाथ शिंदेने दाखवली आहे त्याबद्दल मी त्यांचे कौतुकच करतो. अर्थात हे कौतुक किती मनापासून आहे हे सगळे जाणतात. कारण त्याच वेळेला उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाची गळ



घालून आणि एकनाथ शिंदे यांना दूर ठेवणे हे काम शरद पवारांनीच केले होते. म्हणजे हे कौतुक किती मनापासून आहे हे समजते.

देवेंद्र फडणवीस हे कुशल राजकारणी तर आहेतच पण त्याबरोबर उत्कृष्ट प्रशासक, संघटन, हे गुण त्यांच्याजवळ आहेत. त्याचबरोबर संघाची शिस्त विद्यार्थी परिषदेतून ते पुढे आले आणि त्यामुळे त्यांच्याजवळ ती एक शिस्त आहे. आणि त्यामुळेच त्यांनी पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानला, हे पद स्वीकारले. सत्ता समोर आल्यानंतर मोह सोडायला संघाचे संस्कार आणि देवेंद्र फडणीस यांचे काळीज लागते असे अतुल भातखळकर यांनी म्हटले आहे. हे जरी खरे असल्या तरी भारतीय जनता पक्षामध्ये ब्राह्मण नेतृत्वाचे खच्चीकरण करण्याचे सुनियोजित कारस्थान चालले आहे. आधी पंतप्रधान पदाच्या स्पर्धेतून हटवण्यासाठी नितीन गडकरी यांचे अनेक कारणे खच्चीकरण करण्यात आले आणि आता देवेंद्र फडणवीस यांना बळजबरी उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्याचा आग्रह त्यांना मागे आणलत आहे. याबाबतीत अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अध्यक्ष डॉक्टर गोविंद कुलकर्णी यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

अमित शहा आणि जे. पी. नड्डा यांनी आदेश दिला. देवेंद्र फडणीस यांना उपमुख्यमंत्री पद स्वीकारावे लागले. वास्तविक पाहता पाच वर्षाची यशस्वी कारकीर्द फडणीस यांनी पूर्ण केली होती. त्यांच्यावर कुठलाही भ्रष्टाचाराचा आरोप नव्हता. तरुण तडफदार, कुशल संघटक आणि बुद्धिमान राजकारणी आणि प्रशासनावर योग्य असे नियंत्रण अशा सर्व बाबी त्यांच्याजवळ असताना त्यांचे बाबतीत असा अन्यायकारक निर्णय का घेतला गेला? असा प्रश्न साहजिकच संपूर्ण महाराष्ट्राला पडलेला आहे. अर्थात त्यांना दिलेला आदेश हा त्यांच्या अन्याय करणाराच आहे परंतु पक्ष आदेश म्हणून त्यांनी ते पद स्वीकारले अन्यथा मुख्यमंत्रीपदी निवड हेच योग्य होते. पुढे जाऊन असे म्हणता येईल की पुढील राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रात ब्राह्मण मुख्यमंत्र्याला विरोध बऱ्याच प्रमाणात होत असल्याने त्या दृष्टीने जर पुढे मागे एकनाथ शिंदे गट भाजपमध्ये विलीन झाला तर एक मराठा चेहरा भाजपाला मिळेल हा हेतू असू शकतो. परंतु आपल्याच एका कार्यकर्त्याने मिळालेली लोकप्रियता आणि खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची मागे मुख्यमंत्री पदी केलेली निवड ही अतिशय योग्य अशी होती असे असताना देवेंद्र फडणवीस यांच्यावर हे उपमुख्यमंत्रीपद का लादले गेले हा एक मोठा प्रश्न आहे. महाराष्ट्रात फडणवीस यांचे वाढते महत्त्व आणि लोकप्रियता हे सुद्धा काहीना खपली नाही. तसेच महाराष्ट्रात शरद पवारांच्या नंतर देवेंद्र फडणीस राजकीय खेळ व्यवस्थित खेळू शकतात किंवा कमी वयातच असणारी त्यांची राजकीय आकालनशक्ती ही सुद्धा वाखडण्यासारखीच आहे हेच कुठेतरी काहींना सहन झाले नाही आणि म्हणून त्यांच्या ब्राह्मण असण्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. त्यांचा उदो उदो कमी व्हावा जेणेकरून त्यांचे महत्त्व वाढू न देणे हाच महत्त्वाचा उद्देश समोर येतो. नाहीतर त्यांना डावलण्याचे काहीच कारण नाही.

राज ठाकरे यांनी देवेंद्र फडणीस यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की आपल्या मनातील हुंदका बाजूला सारून पक्ष पक्षाचा आदेश हा कुठल्याही व्यक्तीच्या आकांक्षा पेक्षा मोठा आहे हे तुम्ही तुमच्या कृतीतून दाखवून दिले आहे. पक्षाशी बांधिलकी म्हणजे काय असतं त्याचा हा वस्तूपाठच आहे. ही गोष्ट देशातल्या आणि राज्यातल्या सर्व राजकीय पक्षातील आणि संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी कायमस्वरूपी लक्षात ठेवण्यासारखी आहे.

अर्थातच पक्षाचे काम अतिशय मेहनतीने करणारे फडणीस यापुढेही आपला कार्याचा ठसा नक्कीच उमटवतील यात शंका नाही. आता जरी पक्षाकडून फडणवीसांवर अन्याय झाला असला तरी पुढे मात्र याच पक्षाच्या प्रमुखांना पश्चात्ताप होईल हे मात्र नक्की.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली सध्या महाराष्ट्रात असलेले महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागो. महागाई कमी करण्याच्या दृष्टीने काही करता आले तर ते महत्त्वाचे ठरेल. पेट्रोल डिझेल भाव, शेतकऱ्यांचे प्रश्न, याबाबतीतही काही करावे. सर्वसामान्यांना अजून काय अपेक्षा असते. मुख्य म्हणजे शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट्र आणि भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र ह्या महत्त्वाच्या गोष्टी कायमस्वरूपी लक्षात ठेवाव्यात.



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

# वृक्षारोपण करुया; पर्यावरण संवर्धनाचे वारसदार बनुया

आधुनिक केसरी

**आज माणसाने भरपूर प्रगती केली . मोठमोठ्या इमारती बांधल्या. चकाचक रस्ते तयार केले परंतु हे करत असताना अडथळा ठरत असलेले वृक्ष मात्र सर्रासपणे तोडले. प्रगतीच्या नावाखाली आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेत आहोत हे मात्र आज स्वार्थी माणूस चक्क विसरला. त्यामुळे जंगलातील वन्य प्राणी त्यांचा निवारा हिरावल्यामुळे त्यांनी आपला मोर्चा मनुष्यवस्तीकडे वळविला. याला जबाबदार आपणच आहोत. त्यामुळे ही वनराई पुन्हा नटणे गरजेचे आहे त्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे.**

वृक्षांचे महत्त्व सांगताना जगद्गुरु संत तुकाराम महाराज म्हणतात; "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे पक्षीही सुस्वरे, आळवीती; वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे."

निसर्गाची शोभा वृक्षांमुळे वाढत असते. वृक्षांचा सर्व सजीवांना फायदाच झाला आहे. मनुष्याच्या अन्न वस्त्र निवारा या अत्यावश्यक प्रमुख गरजा आहेत या गरजांची पूर्तता वृक्षांमुळेच होते. वृक्षांमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो.वातावरणातील कार्बन डाय-ऑक्साइड शोषला जाऊन जीवनावश्यक प्राणवायू सोडला जातो. कोरोना रोगाच्या काळात अनेक रुग्ण ऑक्सिजन अभावी तडफडून मेले. त्यामुळे ऑक्सिजनची किती आवश्यकता आहे हे सर्वांनीच अनुभवले आहे. वृक्ष हे आपले मित्र आहेत. वृक्षांची मुळे मातीला घट्ट धरून ठेवतात. तसेच वृक्षांच्या पानांचे आच्छादन जमिनीवर पडल्याने मातीची धूप होत नाही. जमिनीची सेंद्रियता व सुपीकता कायम ठेवण्याचे काम वृक्षांमुळे घडते. वृक्षांपासून आपल्याला फळे, फुले व इतर जीवनावश्यक सर्व घटक मिळतात. जळण्यासाठी लाकूड, जनावरांचा चारा, इमारतीसाठी लाकूड, लिहिण्यासाठी कागद असे एक ना अनेक पदार्थ मिळतात. जंगलातील फळे व लाकूड फाटा विकून कित्येक गोरगरिबांच्या घरची चूल पेटते. आपल्याला अनेक औषधी वनस्पती मिळतात. त्यांचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. वृक्षांमुळे पाऊस पडण्यास मदत होते. वातावरणात गारवा टिकून राहतो. प्रदूषण रोखण्यात वृक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. त्याचबरोबर वृक्ष ध्वनिरोधक म्हणून देखील काम करतात. वृक्ष केवळ आपलेच जीवन प्रभावित करतात असे नव्हे, ते तर आपले अस्तित्व सुरक्षित ठेवण्यासाठी संजीवनी प्रदान करतात. प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन गरजांची पूर्ती करणारा वृक्ष आजही मानवी जीवन आणि समाजाच्या अस्तित्वाच्या संदर्भात महत्वाची



भूमिका बजावीत आहे. मानवाला त्याच्या दैनंदिन जीवनात गरजेच्या सर्व गोष्टी अगदी निरपेक्ष हेतूने वृक्ष देतात. वृक्ष व पशूपक्षी हे परस्पर पूरक आहेत. जिथे वृक्षांची हिरवीगार वनराई असते तेथेच पक्ष्यांचा किलबिलाट असतो.

पण काळ बदलला. माणसांतील माणुसकी हरवली. माणसे स्वार्थी बनू लागली. उंच इमारती बांधण्यासाठी त्यांनी झाडे तोडण्यास सुरुवात केली. रहदारी वाढली, मोठ्या रस्त्यांची निकड निर्माण झाली, तेव्हा जूने जूने वृक्षही तोडण्यात आले. इंधनासाठी झाडाची तोड सुरु झाली. जगभरात विकासाच्या नावाखाली अनेक झाडे तोडली जात आहेत आणि यामुळे गंभीर परिणाम दिसायला लागले आहेत. औषधीयुक्त वनस्पती मिळने दुर्मिळ झाले आहे. झाड नष्ट होत असल्यामुळे पाऊस सुद्धा पडत नाही. या मुळे सृष्टीचे वैभव संकटात पडले आहे. हे थांबवण्याकरिता नागरीकांना वृक्ष तोडीचे भयानक परिणाम समजावून सांगणे आवश्यक आहे. आज मानव झाडे तोडत राहतो पण तीच झाडे पुन्हा लावत नाही. हिरवीगार जंगले त्याने उजाड करून टाकली आणि त्यामुळे पर्यावरणाची भयंकर समस्या आपल्यासमोर उभी राहिली. सुंदरलाल बहुगुणा हे एक प्रख्यात भारतीय पर्यावरणवादी असून चिपको आंदोलनाचे प्रणेते होते. चिपको आंदोलन हे झाडांना वाचविण्यासाठी उत्तराखंड येथे झालेले होते. यामध्ये वृक्षतोडीचा विरोध करण्यासाठी स्त्रियांनी सहभाग नोंदविला व तोड होणाऱ्या वृक्षाला कवटाळून ठेवले. या आंदोलनामुळे शेकडो झाडांची जंगले वाचली.

आपल्याकडे वृत्तपत्रांमध्ये बातमी येण्यासाठी वृक्षारोपण केले जाते परंतु वृक्ष संवर्धन मात्र केले जातच नाही. वर्षानुवर्ष त्याच जुन्या खड्ड्यांमध्ये पावसाळ्यात वृक्षारोपण होते. फोटोमधील चेहरे बदलतात पण वृक्ष वाढताना दिसत नाही. त्यासाठी शालेय स्तरापासूनच प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाळांमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम राबविला पाहिजे. मुलांना वृक्षांचे महत्त्व समजावून सांगितल्यावर नक्कीच ते वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करतात. तरुणांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे ओसाड माळरानावर, गावातील मोकळ्या जागेवर वृक्षारोपण केले पाहिजे. वाढदिवस केक कापून साजरा करण्यापेक्षा वृक्षाचे रोपटे देऊन व त्याचे संवर्धन करून साजरा झाला पाहिजे. वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन ही चळवळ उभी होणे गरजेचे आहे. हे काम कोणा एकट्याचे नाही. त्यासाठी सामूहिक स्तरावर जोरदार प्रयत्न झाले पाहिजेत. तेव्हाच खऱ्या अर्थाने सुजलाम- सुफलाम भारत निर्माण होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# संस्कृती आणि पोशाख

आधुनिक केसरी

**हल्लीचे युग हे आधुनिक युग आहे कारण सर्व जग इंटरनेटमूळे जवळ झाले आहे त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्यामूळे आपल्या देशात झपाट्याने वाढताना दिसत आहेत परंतु चांगले तेवढे घ्यावे या म्हणीप्रमाणे आपण आपली संस्कृतीला ठोकर न मारता ज्यात विकास आहे त्याच गोष्टी घ्याव्यात. आपला पोशाख हा हजारों वर्षांपासून समृध्द पोशाख मानला जातो त्यामध्ये सौंदर्य आहे, या सर्व पोशाखांमागे खूप मोठे विज्ञान दडलेले आहे याचा आजकालच्या पिढीने विचार केला पाहिजे.**

आजकालची नवीन पिढी, नवे विचार, नवीन तोकड्या (शॉर्टकट) कपड्यांचा बाजार, आपलीच मायबोली आणि आपलीच मूलं, मूली मग प्रश्न येतो पोशाखचा. वेगवेगळ्या पध्दतीचे वस्त्र परिधान करा याबाबत दूमत नाही,पण तो पोशाख कसा असावा याबाबत खरंच येणाऱ्या पिढीनीं विचार केला तर.. मॉडर्न जमाना, या नावाखाली ज्या घरात जेष्ठ मंडळी आजी, आजोबा, आई-वडील आहेत त्यांच्यासमोर तोकडे वस्त्र (जे गुडघ्याच्या वरती) अशी आपली भारतीय संस्कृती नाही नं, ही संस्कृती परदेशात, आता ते लोक आपली भारतीय परंपरा परिधान करताना दिसत आहेत आणि आपले भारतीय तोकडे वस्त्र परिधान करताना दिसत आहेत, भारतीय अंगभर कपडे वापरणारी पिढी तोकड्या कपड्यात, ते ही ग्रामिण भागात, तुमच्याकडे लोकं पाहणार नाही तर काय करणार, कारण गावांमध्ये अशी संस्कृती नाही पाश्चात्य संस्कृतीत ते चालते आपल्या संस्कृती मध्ये नाही, आपली मुलं, मुली कपडे खरेदी करण्यास जातात तेव्हा प्रत्येक आई-वडीलांनी प्रेमानेच सांगायला हवं, बघ आपल्याला शोभेल असे कपडे नेहमी खरेदी करावे, ज्यामुळे आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोण, एक चांगला  नागरिक म्हणून आपली ओळख तयार होत असते...

"सब जगह पैसा नहीं देखा जाता, तुम क्या पहनते हो, कैसे रहते हो ये परखा जाता है"

तर कपड्यांवरून आपल्या व्यक्तिमत्वाची ओळख होत असते, पालकांनी याबाबत जागरूकता दाखवायला पाहीजे, आपलं अंग कसं निटनेटकं झाकून राहील याचे धडे आईने आपल्या मुलीला लहानपणापासूनच दिले तर सांगायची वेळ येत नाही. आता ते दिवस राहीले नाही की हिच्या डोक्यावरती साडीचा पदर टिकत नाही खीळे ठोकून घे पुढं सासरी जायचे आहे, असे म्हणणारी मंडळीही आता हयात नाही.

गेला तो जमाना, बदलला आता काळ आता आपणच आपल्या सुना, बाळांना एक स्वच्छंद वातावरणात म्हणजे फ्री ठेवतोय, पण तिथं सुध्दा मर्यादा ही आलीच आणि ती पाळलीच पाहीजे.

आजकाल लग्न झालेल्या नव्या युवा पिढीला, मुलींना एक उपदेश करावासा वाटतो, तो म्हणजे जिन्स पॅन्ट आणि टीशर्ट वरती सगळे सौभाग्य अलंकार काढून तो पोशाख परिधान करणे, कुठं चालली आपली संस्कृती,अहो प्रत्येक अलंकाराचं एक महत्व आहे.

हा पेहेराव करताना कपाळावरची टिकली, कुंकु, गळ्यातलं मंगळसूत्र, हातातील कंकण, असा हा सुंदर पेहेराव काढुन ठेवण्यामध्येमध्ये कुठला मोठेपणा, कशाची फॅशन करतेस तू, तू सौभाग्यवती असताना एका पेहेराव परीधान करण्यापुढे सगळे अलंकार काढून ठेवतेस आधी जाणून घेतलं का या अलंकारांचं महत्व, ज्या वेळेस या अलंकारांचं महत्व जाणून घेतलं तर कोणताही पोशाख परिधान करताना तुम्ही कधीच हे अलंकार काढुन ठेवणार नाही याची मी ग्वाही देते.. खुशाल करा तुम्ही पाश्चात्य वस्त्र परीधान, पणआपली संस्कृती जतन करत फॅशन केली पाहीजे हे विसरायला नको. माणसाने नेहमी वेळे सोबत चालावे, काळानुसार बदलावे, परंतु आपल्या संस्कारांना शेवटपर्यंत आपल्या सोबत ठेवावे....

**-सौ. भाग्यश्री दायमा,** संपर्क क्र. 9850114339

# रिमझिम पाऊस...



कस्तुरी देवरुखकर
संपर्क क्र. : ८२९११४९९९२

आधुनिक केसरी

**बालकवींच्या काव्यातून उमटलेल्या या श्रावणसरी आजही मनामनात रूंजी घालतात.श्रावण म्हणजे सृष्टीसौंदर्याचा आरस्पानी खजिनाच म्हणावा लागेल. या महिन्यात धरती निसर्गाच्या विविध कलाविष्कारात नटलेली असते. ऊनपावसाचा तर पाठशिवणीचा खेळ सुरु होतो या हरितधरेच्या पटांगणात. लहानपणापासूनच श्रावण महिन्याविषयी विशिष्ट प्रकारचे आकर्षण आहे. या मासात हिरवळीच्या कुशीत डोंगरमाथ्यावर कडेकपारीतून वाहणाऱ्या झऱ्यांचा मधुर खळखळाट ऐकू आला की अस वाटत हरित वधू शृंगार करून हर्षाने मनमुराद हसतेय व चांदण रातीत तिचा चंदेरी शालू अधिकच चमकताना दिसतो.**

**नभिस्त मेघांनी चढवला,
शृंगाराचा अनोखा थाट..
मीलनाच्या सांजेत रंगली,
पावसाची पाऊलवाट..**

मी असे नेहमीच म्हणते, "पावसाचे आणि माझे एक नाते आहे" कारण,आमचे एकमेकांकडे चिंब क्षणांचे खाते आहे. पाऊस माझा सखा, सोबती, प्रियकर आहे.  तो जेव्हा धुंवाधार कोसळत असतो तेव्हा माझ्या काळजाचे ठोके चुकायला लागतात. जीव कासावीस होतो. रिमझिम सरीत मात्र मन मोगरा फुलतो.

ग्रीष्मातल्या रखरखीत ऊन्हाने होरपळून निघालेल्या अवस्थेत अंगाची लाहीलाही झालेली असते. सुर्याच्या उष्णतेचा पारा भलताच चढलेला असतो. एव्हाना शाळकरी मुलांची उन्हाळी सुट्टी संपत आलेली असते. मिरच्या, सांडगे, पापड, मिरगुंड, कुरडया, फेण्या..इत्यादी वाळवणे घालून झालेली असतात.

बैठ्या घरांच्या छतावर उन्हाळ्यात साठलेला पालापाचोळा साफ करून नवे कोरी ताडपत्री चढवली जाते. जेणेकरून पावसाची झड घरात येऊ नये. लहानथोरांपासून सर्वच "येरे येरे पावसा" म्हणून पावसाला आर्जवत असतात.

अचानक भर दुपारी आकाशात ढग गर्दी करतात. जणूकाही पर्जन्य प्रस्तावावर मंजुरी मिळवण्याकरता अवकाशात ढगांची सभाच भरते. तुफानी वारा वरूणराजाच्या आगमनाची दवंडी देत खिडकीच्या काचांवर आदळतो. झाडांच्या फांद्यांवर गिरक्या घेतो. मग, मोठ्या दिमाखात पावसाच्या सरी धरतीवर खेळू लागतात. माझ्या कवी मनाला पाऊस तीन अवस्थेत भेटतो. बाल्य, कौमार्य, वार्धक्य.. तो येताना बाल्यावस्थेत असतो. आपले पाऊल अलगद धरतीवर उतरवतो. ओल्या मातीच्या कुशीत शिरून मनमुराद हसतो. सृजनाच्या नवलाईचा मृदगंध सृष्टीच्या रोमारोमात भरतो. म्हणून तर या काळ्या मातीला पान्हा फुटून बीज अंकुरते. बळीराजाच्या स्वप्नांना आशेची पालवी फुटते. हा सुरूवातीचा पाऊस लहान मुलांमध्ये जास्त रमतो. शाळेचा पहिला दिवस त्यात सोबतीला पावसाची रिप रिप. शाळेचा नवा गणवेश घातलेली सानुली लेकरं त्यांच्या पाठीवर दप्तरांचे ओझे घेऊन तसेच रंगीत चकाकणारे,आकर्षक नक्षीचे रेनकोट परिधान करून रस्त्याने चालताना हा लबाड पाऊस त्या मुलांच्या हातात हात घालून शाळेत शिकायला चाललाय असा भास होतो. ओलसर गणवेश सावरत शाळेच्या वर्गात बिचकत ठेवलेले पहिले पाऊल, नव्या कोऱ्या वह्या पुस्तकांचा विशिष्ट गंध, मधल्या सुट्टीत खाऊच्या डब्यातील चटपटीत पदार्थांचा सुवास, आईची येणारी आठवण, वर्गातील सवंगड्यांचा कल्ला.. या वातावरणात पाऊस मात्र वर्गाबाहेर मनमुराद कोसळत असतो. शाळा सुटल्यावर कागदी होड्यांच्या शर्यतीत रममाण होणारा, शाळेभोवती तळे साचवून सुट्टी देणारा, चिमुकल्यांचा मनात घर करून रहाणारा तो बाल्यावस्थेतला, अल्लड पाऊस...!

झिम्माड धारांचा पाऊस येता,
हर्ष सागरा भरती येते..
एक चिमुकली बेभान होऊन,
थेंब सरींचे तळहाती घेते..


मला आठवतय, आम्ही ज्या दिवशी शाळेत जाताना छत्री विसरायचो नेमका त्याच दिवशी हा पठ्ठा धो धो कोसळायचा. कदाचित त्याला आवडत असावं लहान मुलांना चिंब भिजवायला. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेताना ह्याच पावसाने माझ्यातील कवयित्रीला प्रेमाने साद घातली. म्हणूनच माझी पहिली कविता पावसावर होती. तेव्हापासून ते आजतागायत माझा सखा वरूणराजा मला सोबत करतोय.

जसा हा पाऊस तरूणाईला भुरळ पाडतो त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक बालमनाचा ताबा घेतो. बालदोस्तांना तर तो त्यांचा लाडका मित्र वाटतो. "येरे येरे पावसा.." म्हणत ही मंडळी त्याचे हसतमुखाने स्वागत करतात. रिमझिम सरीत मनसोक्त भिजतात. असणारच लाडका हा पाहुणा कारण, कवीवर्य पाडगावकरांनी म्हटल्या प्रमाणे पावसाचा जोर वाढला की "शाळे भोवती तळे साठून सुट्टी मिळते ना.."!

तसेच स्वयंपाक घरातून आजीने बनवलेली गरमा गरम खमंग कांदाभजी अन् आले घालून केलेला मसाला चहा आजी आजोबांच्या प्रेमाची लज्जत वाढवतो. बाबांनी आणलेली भाजलेल्या मक्याची टपोरी कणसं पाहून तर चिल्या पिल्यांच्या तोंडाला पाणी सुटते.

पुढचा टप्पा म्हणजे शृंगाररसात न्हाऊन टाकणारा प्रेमी युगुलांचा चाहता पाऊस.. महाविद्यालयीन किशोरवयीन जोडपे ते थेट साठ सत्तरीच्या आजी आजोबा पर्यंत प्रेमाचा ऋतू खुलवणारा हा किमरागारच. तो आणि ती नाजूक भावबंधांनी गुंतलेले असताना "पाऊस" त्यांच्या भेटीतल्या अलवार अन् लडिवाळ क्षणांना उलगडतो. पावसातील पहिली भेट, रिमझिम सरींचा एक एक थेंब जणू दोघांच्या ह्रदयात सामावत असतो.

मंद धुंद आल्ल्हाददायक गारवा, ढगाळी



कुंद हवा आणि सरीवर सर.अशा वेळी किशोरवयीन ते दोघे दुचाकीवर स्वार होऊन निसर्गाच्या देखण्या अविष्काराला कवेत घेताना ओलेत्या टपोऱ्या थंडगार थेंबांचे रूणझुणणारे संगीत कानात साठवून त्यांना चेहऱ्यावर झेलत यथेच्छ भटकंती करत असतात. खट्याळ वारा तिच्या काळ्याभोर,मुलायम केसांची बट मोठ्या नजाकतीने उडवत असताना दुचाकीच्या आरश्यातून तिला न्याहळणारा तो कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या कवितेतील ओळी आपसुकच गुणगुणतो..

"जेव्हा तुझ्या बटांना, उधळी मुजोर वारा..
माझा न राहतो मी, हरवून हा किनारा "

असे भावविभोर करणारे शृंगारिक वातावरण.

तो ती आणि पाऊस म्हणजे, त्याच्या आणि तिच्या नात्यातला तरूण पाऊस स्वप्नवत, उत्कट, रोमांचकारी, आनंदाची उधळण करणाराच असतो. हुरहुर लावणारा, आपल्याच ऐटीत दंग असणारा अन् विचारांच्या समाधीत चोर पावलांनी हजेरी लावून ध्यानस्थाची तपश्चर्या भंग करणाऱ्या मेनकेसारखा मदमस्त पाऊस. ह्या टप्प्यातल्या पावसाला अनेक नाजूक कंगोरे आहेत.

तिची आणि त्याची अशाच चित्तचोर पावसात अचानक भेट होते. एका छत्रीतून प्रवास सुरू होतो. एकत्र घेतलेली गरमा गरम कॉफी, आठवणींच्या सरितेत मनसोक्त बुडालेले दोघांच्या मनाचे तट. ओलावल्या मिठीत, हातांच्या साखळ्यात दडलेला गोड स्पर्श. सारेच बेभान करणारे. कधी हा पाऊस चक्क विवाहोत्सुक तरूणाईला मध्यस्थ करणारा पाहुणाच वाटतो. सासर माहेर यांच्यातील दुवाच. पावसासोबतच वरपक्षाकडून आलेला होकाराचा सांगावा वधुपक्षाला आनंदसरीत भिजवून टाकतो. मग याच मेघराजाच्या साक्षीने भेटीगाठींचे सुरेख सत्र रंगत जाते. प्रेमाच्या जाणिवेत गुंतलेले तरूण युवक युवती जेव्हा आयुष्याच्या वाटेवर एकमेकांचे जीवनसाथी होण्यास पसंती दर्शवतात तेव्हा पाऊस एखाद्या घनिष्ट मित्रा प्रमाणे प्रेमी युगुलांकरीता उत्साहाचे कारंजे फुलवतो.  तर काही ठिकाणी नुकतेच विवाह बंधनात बांधले गेलेले ते दोघे. पावसाचे मनमोहक स्वरूप अनुभवताना त्यांच्या रेशमी नात्याचा धागा अधिकच मजबूत होतो. वटपौर्णिमेच्या दिवशी नखशिखांत नटलेल्या विवाहितेचा शृंगार थाट पाहून पावसाचेही मन गुलाबी होत असावे. म्हणून तर तो जलपुष्पांचा वर्षाव करत तिच्या सौंदर्याला दिलखुलास दाद देत असतो. तिच्या पैजणांचा छुमछुम आवाज आणि पावसाचे कर्णमधुर संगीत यांच्यातील जुगलबंदी ऐकताना तिचा सखा अक्षरशः भारावून जातो.

आषाढ पागोळीचा पाऊस सासरी गेलेल्या लाडक्या लेकीचा माघारी बनून जातो. तर याउलट आषाढी एकादशीला विठू माऊलीच्या दर्शनास जमलेल्या वारकरी मेळ्यात तल्लीन होऊन भजन, कीर्तनाचा नाद होतो. भक्तिरसाचा आस्वाद घेताना विठ्ठल नामाच्या गजरात जलवीणा वाजवत संत परंपरेचा वंशज होतो. गौरीगणपती च्या सणाला वाजत गाजत अहोरात्र जलनृत्य करणारा नटराज पाऊस अगदी नवरात्री, हातगा गाजवेपर्यंत विश्रांती घेत नाही.

नव्या जोडप्याच्या संसाराची घडी बसवायला आलेला हा पाहुणा कधी त्यांच्या कुटुंबाचा महत्त्वाचा सदस्य बनून जातो ते कळत नाही.वर्षानुवर्षे सुख दुःखाचे अनेक प्रसंग चिंब स्मृतीत साठवून ठेवतो.

कित्येक पिढ्या आल्या गेल्या. आचार विचार बदलले तरी पावसा विषयी वाटणारी आंतरिक ओढ प्रत्येक रसिक मनात कायम टिकून आहे. आत्ताची पिढी आधुनिकतेच्या धुंदीत असली तरी खेडे असो वा शहर, मानवी संवेदनांना जागृत करणारा पाऊस आजही तोच आहे. त्याचे उदाहरण म्हणजे आजच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी ही कविता..

आठवड्याचा पहिला दिवस,
सकाळी उठल्यावर,माझा मूड मस्त होता..
तो मात्र, कामाच्या व्यापाने त्रस्त होता..
त्याचे नेटवर सर्फिंग चालू होते,
माझे दुपारच्या मेनूसाठी सर्चिंग चालू होते..
अचानक गार वारा वाहू लागला,
पावसाच्या सरी,खिडकीच्या काचांवर
थेंबाच्या रुपात बरसू लागल्या..
मग,माझ्या मनाने उचल घेतली,
त्याला म्हटलं ,आज सुट्टी घे ऑफिसला
काय फरक पडतो नाही गेलास,
एक दिवस कामाला ?
त्यावर तो म्हणाला,नको ग बाई !
उत्तर काय  देणार डोक्यावर बसलेल्या बापाला ?
तो म्हणाला, ही फाईल आज,
मला करायची आहे कंप्लीट
मी म्हणाले,अरे पण नुकतीच एक फाईल
माझ्या ह्रदयाच्या फोल्डर मधून ट्रान्स्फर होते आहे,
ती तर कॉपी करशील ?
मग,विजांचे कडकडाट झाले,
ढग गडगडले..
काय करावे त्याला काही सुचेना
उठलेल वादळ शांत करणं त्याला काही जमेना
त्याने सुट्टीचा प्रस्ताव मान्य करण्याचे ठरविले
तेव्हा कुठे विचारांचे नेटवर्क एका जागी स्थिरावले
फॅमिली ड्रामा ,प्रेमकथेवर येऊन थांबला
यांत्रिक जीवनावर आज त्यांने प्रेमाचा
विजय होताना पाहिला..

तो, ती आणि पाऊस... या तिघांची मैफील जमल्यावर क्षणांची भन्नाट मालिका सुरू होते. जीवनपटात भूमिका वटवताना अकस्मात सुटलेला त्याचा वा तिचा हात,दाटून आलेला हुंदका,तिच्या आठवणीने व्याकुळ झालेले मन, सुकलेल्या अश्रूंचे कोरडे वार हे सर्व झेलताना सह्रदयी पाऊस त्यावर ओल्यावाचे शिंपण करतो.

पाऊस कवितेतून व्यक्त होताना, पावसाच्या स्पर्शाने शब्दांचा शृंगार झाल्यावर कोऱ्या कागदाच्या दर्पणात माझी काव्य प्रतिमा उमटते ती अशी...

रिमझिम ओल्या सरी
साजणाची भेट स्मरली उरी..
आलास तू स्वप्न चिंब होऊनी
कोसळला मुग्ध पाऊस दारी..
कवेत भिजला आठवं मणी
शांत झाल्या एकांताच्या म्हणी..
स्पर्श ओला जाणवतो ओठांवरी
चिंब झाले ह्रदयाच्या पानोपानी..
तुझ्या सहवासात सखया
शतजन्माचे सौख्य मिळे जीवनी..

शेवटच्या टप्प्यातला परतीचा पाऊस हा वार्धक्य रूपी भासतो. सलग तीन महिने रात्रंदिवस गाजवल्या नंतर काहीसा मंदावलेला परंतु, धरतीचे अंतःकरण ओलावण्यास नव्या जिद्दीने सरसावलेला असा तो. त्याची ही अवस्था पाहून आभाळ गहिवरते व कडाडणाऱ्या विजेच्या, गडगडणाऱ्या ढगांच्या उद्रेकात टाहो फोडत असते. "हस्त" नक्षत्रात पडणाऱ्या ह्या पावसाला "हत्तीचा पाऊस" असेही म्हणतात. आपण बाळाच्या जन्माचे आनंदाने स्वागत करतो. बाल्यावस्था सहज स्वीकारतो. तितक्या सहजतेने वार्धक्य स्वीकारत नाही. त्यामुळे या वयोगटातील वृद्ध मंडळी लहान मुले व तरूणांच्या मानाने दुर्लक्षित राहतात. तसेच काहीसे परतीच्या पावसाच्या वाटेला येते. पाऊस येताना ओसंडून वाहणारा उत्साहाचा झरा मात्र परतीच्या पावसाला निरोप देताना आटतो. हा विरोधाभासच म्हणायचा.

**(उर्वरित उद्याच्या अंकात)**

# आजीचं वृक्षसंवर्धन ...



सौ. राधिका पंडित
संपर्क क्र. : 8451027554

आधुनिक केसरी

**आजीचा वृक्षसंवर्धनाचा संदेश प्रत्येक घरां.. घरांमधून जावयास हवा...आज माझी आजी नाही...पण आजीच्या अंतःकरणातील ही संवेदना हा संदेश आपल्या गावातील प्रत्येक घराघरांतून आपणं साऱ्यांनीच पोहोचवायला हवाच ना... मग आता पावसाळा सुरू होतं आहे लागयुयात कामाला...". आजीचा वृक्षसंवर्धनाचा संदेश घेऊन "....**

मामाचं घर म्हणजे भाच्यांचं हक्काचं स्थान. दर सुट्टीत आईच्या माहेरी जाण्याचं आवडीचं ठिकाण. मामी वयाने मोठी असली तरी मला ती जवळच्या मैत्रिणी सारखी वाटते. लाड जे करते ती प्रेमाणे. मामा-मामीचे आमंत्रण आल्याबरोबर आम्ही लगेच निघालो. कारखाने, वाहने, प्रदुषण, अस्वच्छता आणि सिमेंटचे जंगल ओलांडून मोकळा श्वास घेण्यासाठी आम्ही मनाने गांवाकडे पोहोचलो.

येताना रस्त्याच्या कडेने दिमाखात उभे असलेले हिरवेगार वृक्ष बघून मन हरखलं. त्याच वेळी मनात आलं, पुण्याला सिंहगड रोडवर कितीतरी विस्तीर्ण घनदाट वटवृक्ष होते. त्यांच्या सांवलीत थकलेलें जीव शांत निवांत विसावायचे. निसर्ग सौंदर्य, पक्षांचे सुस्वर केकारव, आणि मोकळी शुद्ध, प्रदूषण मुक्त हवा मिळाल्याने, उत्तम आरोग्याची साथ मिळायची, आणि आता ? श्वास कोंडतोय आपला. म्हणून वृक्षतोड ही थांबवायलाच हवी. हे निसर्गाचं सौंदर्य, त्याच देणं, वसुंधरेचं दान, आपण जतन करायलाच हवंय नाही का?

वृक्षतोड थांबवून गाववाल्यांनी जपलेलं हे निसर्गदत्त लेणं पहात असताना मन प्रफुल्लित झालं आणि वाटलं, शहरातल्या भरगच्च पदव्या मिळवणाऱ्या पदवीधरांच्याही लक्षात न आलेली गोष्ट या कमी शिकलेल्या गावकऱ्यांनी किती चटकन आत्मसात केली आहे. ह्या वसुंधरेला, निसर्गाला आईच्या मायेने जपलंय त्यांनी. झाडे वाढवून आणि जगवून केवढा दिलासा दिलाय त्यांनी मुक्या प्राण्यांना. भयापासून जीवदान दिलय बिचाऱ्या पाखरांना. अहो हेच खरे पदवीधर आणि मोठमोठ्या मानाचे मानकरी आहेत.

मागे आपल्या राष्ट्रपतींनी नाही का अशा निसर्ग बचावाच्या मोहिमा राबविलेल्या ग्रामीण भागातील कितीतरी व्यक्तींना पद्म पुरस्कारांनी अलंकृत केलं, ते दूरदर्शन वर बघितल्याचं आठवलं.

एक श्लोक आठवला-

**एकत : कांचनो मेरू :**
**बहू रत्नः वसुंधरा.**
**भयभितत्स्य प्राणीन :**
**प्राण रक्षणम.**

अर्थात, एका पारड्यात सोन्याचा मेरू पर्वत आणि पुष्कळ पाचू



रत्नांनी नटलेली, हिरवाई, ल्यायलेली वसुंधरा तर दुसऱ्या पारड्यात घाबरलेल्या पशुपक्ष्यांना आश्रय दान, अभयदान व जीवदान दिलेलं वृक्षांचं हे दान सारख्याच मोलाचं आहे. पर्यावरण हेच खरे श्रेष्ठदान मानलं जातं. तर अशा या प्रसन्न वातावरणातून प्रसन्न मनाने आम्ही मामाकडे पोहोचलो. आजीचा मायेचा हात पाठीवरून फिरला. ती म्हणाली "दमलांत कां रे बाळांनो? आता पूर्ण विश्रांती घ्या. उद्या सकाळी आपण देवीच्या डोंगरावर जाऊ या हं! तुम्ही उठाल ना पहाटे लवकर?"

"होSS, होSS" असा भरगच्च होकार भरत, आम्ही आरोळी ठोकली.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे, सुमंगल प्रभाती आम्ही लवकर उठून डोंगर चढायला सुरुवात केली. एरवी शहरात सूर्यवंशी असलेले आम्ही लवकर उठलो. निसर्गाचं हे प्रचंड रूप बघून चकितच झालो. मामी मला सांगत होती, "बरं का अनुष्का, हा खरा देवराईचा डोंगर आहे. पण वर माथ्यावर देवीचं पवित्र स्थान आहे ना! म्हणून त्याला देवीचा डोंगर म्हणतात. ही श्रद्धा आहे गाववाल्यांची, आणि त्याच श्रद्धेने देवीचा प्रसाद म्हणून हे सोज्वळ भक्त, या वृक्षांची फळं, फुलंच काय पण पानं सुद्धा तोडणं पाप मानतात, आणि म्हणूनच तर ही वनराई सुरक्षित राहिली आहे. नाहीतर आपण बघ ना ! शहरातून पानं, फळं फुलं सुद्धा ओरबाडतो, भलेमोठे वृक्ष सुद्धा पाडतो. असं नकोय ना गं करायला? या झाडांना पण जीव असतो नाही का गं?"

आजी म्हणाली, "अनुष्का बघ! मामी किती छान बोलतीय. आणि हो! हे सगळं लक्षात ठेवायचं बरं कां!"

त्यावर मामा म्हणाला, "तुला एक गंमत सांगू बाळा, आमच्या लहानपणीची गोष्ट आहे बरं का ही. हिरवागार चारा खाऊन धष्टपुष्ट झालेली एक म्हैस होती आमच्या घरी." मामा पुढे सांगत होता, "तुझी आजी ग्रेट आहे हो! तिने नामी शक्कल लढवली. फुलांच्या फळांच्या बिया जमवल्या आणि मग मिसळल्या की तिने त्या गाई-म्हशीच्या शेणात.

आणि बरं का अनुष्का, पुढची गंमत तर ऐक. त्या बिया मिश्रणाचे तीने केलें लाडू."

"वॉव, लाडू? हे काय नवीन आणखी? रव्याचे लाडू, बेसनाचे लाडू ऐकलेत. पण शेणाचे लाडू ? म्हणजे हे कसं काय ?"

आजी गालातल्या गालात हसत होती. मग मामा ही तिच्याकडे बघत मिस्किलपणे म्हणाला "अगं आईने आम्हाला रव्याचे लाडू दिले, बेसनाचे लाडू दिलें, प्रसंगी धम्मक लाडू सुद्धा दिलेत, शिवाय हे शेणाचे बियां मिश्रित लाडूही दिले आणि सांगितलं, 'खेळायला टेकडीवर जाल, डोंगरावर हुंदडायला जाल ना! तिथे हे बियांचे लाडू टाकायचे म्हणजे बी रुजतं. पाऊस पडतो. खतपाणी मिळून रोप वाढतं, आणि कालांतराने त्याचं मोठ्या वृक्षात रूपांतर होतं. अशा प्रकारे पर्यावरणाला मदत होते आणि निसर्ग बहरतो. तर बाईसाहेब असं होतं आमच्या आईचं ग्रेट तत्त्वज्ञान.

जमिनीत बी रुजवताना, चांगल्या कामाचं, चांगल्या विचारांचं, उत्तम संस्कारांचे बीज, तुझ्या आजीने माझ्या आणि तुझ्या आईच्या मनांत हळूवारपणे रुजवलं." हे सांगताना मामा कौतुकाने आजीकडे बघत होता.

आणि मी? डोळे विस्फारून अवाक् होऊन, माझ्या आजीचं तत्त्वज्ञान आणि सुंदर विचारांचं रूप मनांत साठवत होते. मी म्हणाले, "आजी कुठे शिकलीस गं हे? कसं गं सुचतं तुला हे सगळं? मोठमोठ्ठे पदवीधर सुद्धा तुझ्या ह्या तत्त्वज्ञाना पुढे माना झुकवतील तुझ्या बुद्धी पुढे."

मामी हसतच म्हणाली, "आहेतच आमच्या सासूबाई हूशार".

मी म्हणाले "खरंच! खरंय गं मामी, अगदी बरोब्बर बोललीस. पण मी आता ठरवलंय. आम्ही पण झाडे लावू आणि झाडे वाचवू...

आजीचा हा वृक्षसंवर्धनाचा संदेश प्रत्येक घरां.. घरांमधून जावयास हवा...आज माझी आजी नाही...पण आजीच्या अंतःकरणातील ही संवेदना हा संदेश आपल्या गावातील प्रत्येक घराघरांतून आपणं साऱ्यांनीच पोहोचवायला हवाच ना...

मग आता पावसाळा सुरू होतं आहे लागयुयात कामाला...".

आजीचा वृक्षसंवर्धनाचा संदेश घेऊन "....

# मुलं म्हणजे देवाघरची फुलं



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**मुलं अतिशय निरागस असतात. त्यांचं आयुष्य कोऱ्या पाटीप्रमाणे असतं. तुम्ही जे शिकवाल, जे संस्कार कराल त्यानुसार ते घडत असतात. मातीचा गोळा घडवण्यासाठी जसा कुशल कारागिर लागतो. अगदी तसंच लहान मुलं घडवण्यासाठी पालकांना देखील कुशल बनावं लागतं. पालकांनी काही गोष्टी फॉलो केल्या तर त्यांची मुलं कायमच अव्वल राहतील.**

प्रत्येक पालकांना वाटत असतं, आपल्या पाल्यात इतरांपेक्षा काहीतरी वेगळेपण असावं. तो प्रत्येक गोष्टीत अव्वल असावा. पण बऱ्याचदा आपल्या मनाप्रमाणे होत नाही. कारण ते आपलं अनुकरण करत असतात. आपल्या अनुकरणातूनच ते घडत असतात. प्रत्येक मुलाचे स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. त्याला त्याच्या नैसर्गिक गुणांना अनुसरून प्रगती करण्यास मदत करायला हवी. प्रत्येक मुलाला त्याच्या नैसर्गिक कला गुणांचा विकास करू दिल्यास त्याला इतर मुलांच्या प्रगतीचा हेवा वाटणार नाही. प्रत्येक मुलावर सारखेच व त्याच्या अनुषंगाने प्रेम दाखवावे. वाईट वर्तन सुधारताना वा त्याला आवर घालताना आपणच ठरविलेल्या गोष्टी शिकण्याची त्याच्यावर सक्ती करु नये. त्याऐवजी त्याच्या वैयक्तिक गुणांचा सर्वोत्तम विकास कसा होईल याचे मार्गदर्शन करावे.

मुलं अतिशय निरागस असतात. त्यांचं आयुष्य कोऱ्या पाटीप्रमाणे असतं. तुम्ही जे शिकवाल, जे संस्कार कराल त्यानुसार ते घडत असतात. मातीचा गोळा घडवण्यासाठी जसा कुशल कारागिर लागतो. अगदी तसंच लहान मुलं घडवण्यासाठी पालकांना देखील कुशल बनावं लागतं. पालकांनी काही गोष्टी फॉलो केल्या तर त्यांची मुलं कायमच अव्वल राहतील.

लहानपणी मुलं खूप लाजाळू, मितभाषी आणि त्यांचं व्यक्तिमत्त्व थोडं वेगळं असतं. अतिशय गोड असलेली मुलं खूप निरागस असतात. बाहेरील जगाची फार ओळख नसताना या मुलांना घडवताना सुरुवातीला पालकांना थोडी मेहनत घ्यावी लागते. पालक म्हणून तुम्ही त्यांना घडवणार आहात. अशावेळी आपलं मुल अतिशय आत्मविश्वासू आणि अव्वल राहावं, असं प्रत्येक पालकांना वाटतं.

प्रत्येक मुल वेगळं असतं. काही मुलं सुरुवातीपासूनच आत्मविश्वासाने भरलेली असतात. पण काही मुलं खूप शांत असतात. या



मुलांवर पालकांना थोडी मेहनत घ्यावी लागते. अशावेळी नेमकं काय करायचं? हा प्रश्न पालकांना पडतो. तेव्हा तुम्हाला काही गोष्टी फॉलो करत मुलांना आत्मविश्वास द्यावा लागेल. यानंतर मुलांमधील बदल हा कौतुकास्पद असेल यात शंकाच नाही. प्रत्येकाकडून तुमच्या मुलाचं कौतुक झाल्याशिवाय राहणार नाही.

मुल हे धडपडत शिकत असतं. त्यामुळे त्याच्या प्रत्येक कामाचं कौतुक करत चलावे. त्याच्यासोबत खंबीरपणे उभे राहावे. कारण प्रयत्न हे रत्न अतिशय महत्वाचं आहे. तुमच्या मुलाला बहुदा कोणत्याही गोष्टीत लगेच यश मिळणार नाही, पण त्याचं कौतुक करावे. त्याच्या प्रयत्नांमागे खंबीरपणे उभे राहावे.

मुलं फार विचार करत नाहीत. ते स्वच्छंदी जगत असतात. परंतु जर त्यांना कोणत्याही गोष्टीशी स्वतःहून तडजोड करावी लागली तर त्यांना ते करू द्यावे. स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्यासाठी सोबत उभे राहावे. मग ते प्रश्न शाळेतील असो वा अगदी खेळण्यातील. फक्त पालक म्हणून तुम्ही त्यांच्यासोबत आहात ही भावनाच वेगळी असते.

मुलांसाठी त्यांचे पालकच आदर्श असतात. त्यांना पाहूनच ही मुलं घडत असतात. अशावेळी तुम्ही तुमच्यासमोर काही ध्येय ठेवावे. जी ध्येय पाहून तुमची मुलं शिकतील. या ध्येयामध्ये तुमच्या मुलांचाही हातभार असू द्यावे. उदाहरणार्थ सकाळी लवकर उठणे, चालायला जाणे, छान गप्पा मारणे... या अगदी हलक्या फुलक्या ध्येयांनी मुलांना सवय लावावी. ही ध्येय वास्तववादी असल्यामुळे ती गाठताना मुलांना सत्याची जाणीव होईल.

अपयश ही यशाची पहिली पायरी असते. लांब उडी घेण्यासाठी दोन पाऊलं मागे जावं लागतं. या दोन गोष्टी मुलांच्या मनावर बिंबवा. अपयश आलं म्हणजे संपल असं होत नाही. जी गोष्ट तुमच्यासाठी बेस्ट आहे, ती तुम्हाला मिळणारच. अशावेळी मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची नितांत गरज असते.

लहान मुलं स्वच्छंदी असतात. मात्र आपणच अनेकदा त्यांच्यावर कळत नकळत चुकीचे संस्कार करत असतो. आनंद हा कोणत्याही गोष्टीत नसून तो त्यांच्यात लपला आहे. याची जाणीव त्यांना करून द्यावी. कारण आपला आनंद हा आपल्याच हातात आहे, याची जाणीव त्यांना खूप लहानपणापासूनच करून द्याल.

# सिंगल युज प्लास्टिकीवरील बंदी स्वागतार्हच

आधुनिक केसरी

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे जैवविविधता आणि पर्यावरण धोक्यात येत असल्याने सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालावी अशी मागणी पर्यावरणवादी कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य जनतेतून होत होती उशिरा का होईना अखेर या मागणीला यश मिळाले असून केंद्र सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असून समाजातील सर्व स्तरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे. ही बंदी १ जुलैपासून लागू झाली असून या निर्णयानुसार सिंगल युज प्लास्टिकच्या १९ वस्तूंवर सरकारने बंदी घातली असून त्यात थर्माकॉलच्या प्लेट्स, ग्लासेस, कप, कटलरी जसे की काटे, चमचे, चाकू, स्ट्रॉ, ट्रे, मिठाईच्या पेटीवर लावण्यात येणारे रॅपर, निमंत्रण पत्रिका, सिगारेटच्या पाकिटावरील रॅपिंग फिल्म, प्लास्टिकचे ध्वज, फुग्याच्या काड्या, आईस्क्रीमच्या काड्या, कॅण्डी स्कीम आणि १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकच्या पिशव्या यांचा समावेश आहे. बंदी घातलेल्या या वस्तूंचे अवैध उत्पादन, आयात, वितरण आणि विक्री रोखण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सध्याचे युग प्लास्टिकचे युग असल्याचे मानले जात आहे. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करत आहे. सहज व कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडीबल म्हणजेच कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून अस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायुप्रदूषण होते. हा कचरा जमनीखाली दबल्यानंतर पाण्याच्या स्तोत्रांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज प्लास्टिक नदी, तलाव, विहिरीत टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिक मुळे जलचरांना मोठा धोका निर्माण झाला. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाहीत, पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्षे राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याचा गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिकमुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैव विविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर केंद्र सरकारने घातलेली बंदी योग्यच आहे. आता या बंदीची सरकारने प्रभावी अंमलबजावणी करायला हवी. कारण आपल्याकडे मोठ्या धुमधडाक्यात निर्णय होतात ; पण त्याच्या योग्य अंमलबजावणी अभावी परिणाम शून्य ठरतात. या निर्णयाबाबत तरी तसे होऊ नये ही अपेक्षा. सरकारने केवळ बंदी घालून थांबू नये तर सिंगल युज प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी जनजागृतीही करायला हवी. सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनीही सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैवविविधता राखण्याचा मार्ग आहे.

# हिरवी राने पीवळी झाली...!

## भोकरला खरिप पिक कोमेजली

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पाऊसाच्या आगमनाने सारी सृष्टी टवटवीत बनते आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहू लागतो.. उन्हाच्या तीव्रतेनी भेगाळलेली जमिन एका थेंबासाठी आसूसलेली असते... खरिप हंगामाला संजीवनी देणारा पाऊस यंदा मात्र रूसला आहे.. मागील दिड महिन्यांपासून पाऊस रूसला आणि कोप-यात जाऊन बसल्याने.. हिरवीरान पीवळी चूटूक झाली आहेत... हवामान विभागाचा अंदाज हूकला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नाचा चूराडा झाला.

तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून पाऊसाची लपाछपी सूरू आहे. येथील पर्जन्यमान हे एक हजार मिलिमीटर इतकं आहे. कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाल्याने उत्पादनात मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे. कसबस धनधान्य हातात आलं तर बाजारपेठेत मालाला भाव नाही. नफा तर सोडाच शेतीत टाकलेल्या पैशाची बरोबरी झाली नाही. बळीराजाला चारहि बाजूंनी संकटांनी विळखा घातला आहे. यातून सूटका कशी होईल याची भीती मनामध्ये घर करून आहे. निसर्ग दरवर्षी नखे काढून शेतकऱ्यांचा पाठलाग करतो आहे. यावर्षी तरी वरूणराजा मेहबान होईल याची आशा होती नव्हे तर हवामान विभागाने चांगला पाऊस होईल अशीच गोड बातमी दिली पण त्यांचा अंदाज चूकला आणि पाऊस चक्क रूसून बसल्याने खरिप हंगामातील कोवळी पीके धोक्यात आली आहेत. उन्हाची तीव्रता आणि अधूनमधून पाऊस सरी, वीजेचा गडगडाट असा लंपडाव सूरू आहे. खरिपहंगामासाठी पूरेसा पाऊस होणे गरजेचे आहे त्यामुळे सर्वांच्या नजरा आकाशाकडे टक लावून आहेत.

**४३ हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी**

तालुक्यात यंदा कापुस( २४२९५ हेक्टर), सोयाबीन (११००),हळद (२५२७), कडधान्य (४३७३), ईतर पीक (१३००)अशी एकूण (४३,५३० हेक्टर क्षेत्रात) पेरणी झाली आहे.नगदिपीक म्हणून कापसाचे क्षेत्र वाढले आहे.

**सोयाबीनची अशी काळजी घ्यावी**

पावसाने ओढ दिल्याने आंतरमशागत करून पानाव्दारे होणारे बाष्पीभवन कमी करण्यासाठी पोटॅशिय(१३:०:४५) फवारणी करून तण नियंत्रण ठेवणे.तीन पानावर असताना ईमाझीथॅपीर-२०० मीली प्रती १० लीटर पाण्यात किंवा ईमाझीथॅपीर+ईमॉझामाक्स४०ग्रम प्रती एकर २०० लीटर पाण्यात फवारावी. खोडमाशी व चक्रिभुंगाचा प्रादुर्भाव नियंत्रणासाठी प्रोफेनोफॅस५० ईसी२० मीली प्रती १० लीटर पाण्यात किंवा कोरन्टिनीलीप्रोन-३ मीली प्रति १० लीटर पाण्यात किंवा थायोमिथोक्झाम-३ लॅम्बडा सायहॅलोथ्रीन-५ मीली पैकी एक फवारणी करावी.

### केवळ ९८ मीलीमिटर पाऊस

**तालुक्यात पावसाची सरासरी एक हजार मिलिमीटर असून क्वचीतच सरासरी ईतका पाऊस झाल्याचे समजते.त्यामूळे खरिप,रब्बी हंगामातील उत्पादन समाधानकारक होत नाही. यंदा पाऊस समाधानकारक होईल असे भाकीत केले पण आज पर्यंत तालुक्यात केवळ ९८ मीलीमीटर इतक्याच पावसाची नोंद आहे. पेरणी योग्य पाऊस झाला नसला तरी शेतकऱ्यांनी खरिपाची पेरणी केली आहे.पावसाअभावी पीके धोक्यात आली आहेत.**

### कापसाची अशी निगा राखा

**एकदल वर्गीय तणनियंत्रणासाठी क्यूझॉलफॉप ईयाईल२० मीली प्रति १० लीटर पाण्यात फवारावी. द्विदलवर्गीय पिकासाठी पायरीथायो, बॅकसैडीयम १२.५ मीली प्रति १० लीटर पाण्यात फवारणी करावी. (तण नाशक फवारणी करताना जमीन ओली असणे गरजेचे आहे) सदरील औषधांची मात्रा साध्या नॅपसॅक पंपासाठी आहे.चार्जींगच्या पंपासाठी हि यात्रा दूप्पट वापरावी तर पॉवर पंपासाठी तीनपट करावी.**

**विठ्ठल गीते,**
**तालुका कृषी अधिकारी भोकर**

## कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**शंकरपुर :** येथील शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवार, रोजी दि.२ सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली. संतोष राजाराम कहाटे (४५,रा. शंकरपूर) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.



दरम्यान या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. संतोष कहाटे यांनी शनिवारीज्ञसायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास शंकरपूर येथील शेतवस्तीवरील राहत्या घरासमोरील लिंबाच्या झाडाला दोरीने दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सायंकाळी उघडकीस येताच घरच्यांनी तातडीने आरडाओरडा केल्याने मोठा भाऊ जालम राजाराम कहाटेसह इतरांनी त्यास प्रथम लासूर स्टेशन येथील खासगी हॉस्पिटलमध्ये आणून त्यानंतर येथील प्रथमिक आरोग्य केंद्रात नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. तैसीन शेख यांनी तपासून मृत घोषित केले. रविवारी सकाळी मृत शेतकऱ्यांवर उत्तरीय तपासणीनंतर शंकरपूर येथे अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. मृत शेतकऱ्याच्या पश्चात वडील, एक भाऊ, पत्नी, दोन मुली असा परिवार आहे.



## होल्डिंग हँड्सचे गोगाबाबा टेकडीवर स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** होल्डिंग हँड्स बहुद्देशीय संस्थेतर्फे आज गोगा बाबा टेकडी आणि टेकडीचा परिसरात स्वच्छ्ता अभियान राबविण्यात आला. टेकडीवर व टेकडीच्या पायथ्याशी पडलेला कचरा, प्लास्टिक, प्लास्टिक बॉटल्स अशा कचऱ्याचे संकलन करण्यात आले. शिवाय मागच्या रविवारी याच परिसरात होल्डिंग हँड्सने मा. जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण केले होते. त्या लावलेल्या रोपांची निगा राखली. रोपांना आळे केले, रोपांच्या सपोर्ट साठी बाबूंच्या काड्या लावण्यात आल्या, पाणी देण्यात आले. रोपांच्या बाजूचं गवत काढले. नवीन रोपे लावण्यात आली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, राज्य पर्यावरण प्रमुख मंगला महाजन, औरंगाबाद विभाग प्रमुख सस्मिता डोंगरे, जिल्हाध्यक्षा वर्षा जैन, उमेश डोंगरे, किरण वनगुजर, सुवर्णा उदवंत, सुवर्णा वनगुजर, ॲड. श्वेतांबरी भिंगारदेवे, आशिष महाजन, प्रतिभा शर्मा, अजय जोशी, प्राची सिरसीकर, बळीराम पवार इत्यादी उपस्थित होते.

सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही राज्यभरात सक्रिय असून राज्यभरात या संस्थेच्या शाखा आहेत. राज्याच्या बाहेर ही पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते.

## आशा बगे यांना शब्दसृष्टी डॉ. विजया स्मृती जीवन गौरव सन्मान प्रदान समारंभ संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : भारतीय साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान 'शब्दसृष्टी' चा द्वितीय "शब्दसृष्टी डॉ. विजया स्मृती जीवन गौरव सन्मान" मराठीतील सुप्रसिद्ध लेखिका व कथाकार आशा बगे यांना 'शब्दसृष्टी' प्रतिष्ठान चा सोळावा स्थापना दिन आणि डॉ. विजया यांच्या चतुर्थ स्मृतिदिनाच्या प्रीत्यर्थ शुक्रवार, दिनांक 1 जुलै 2022 ला "शब्दसृष्टी प्रतिष्ठान" आणि "मनोहर मीडिया" द्वारा नागपूर येथे (आशा बगे यांच्या निवासस्थानी) आयोजित छोटेखानी समारंभात नागपूरच्या जिल्हाधिकारी आर. विमला यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानाचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे होते. समारंभाचे अध्यक्षस्थान दैनिक "तरुण भारत" नागपूरचे स्थानीय संपादक शैलेश पांडेय जी ने भूषविले. या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून दैनिक "महाराष्ट्र टाइम्स" चे स्थानीय संपादक श्रीपाद अपराजित जी आणि विशेष अतिथी म्हणून नागपूरच्या सुप्रसिद्ध लेखिका व मंच संचालक रश्मी पदवाड-मदनकर जी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आर. विमला जी यांनी डॉ. विजयाजींच्या स्मृतीला प्रणाम करून म्हणाले की— मानवी व्यक्तिमत्वात अंतर्भूत संवेदना इतरांपर्यंत पोचविण्यास उत्तम व उचित साधन लेखन आहे. नागपुरात आल्यानंतर अनेक महान व्यक्तिमत्वांशी परिचय झाला. सोबतच गुरुवर्य डॉ. मनोहर जींच्या माध्यमातून नागपूरच्या सुपुत्री आणि साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मराठीच्या सुप्रसिद्ध लेखिका व कथाकार आशा बगे यांचे साहचर्य प्राप्त झाले.

यानंतर सन्मानमूर्ती आशा बगे जी यांनी ज्यांच्या स्मृतीमध्ये त्यांना "जीवन गौरव सम्मान" दिला गेला, त्या डॉ. विजया जींच्या संदर्भात आपले विचार मांडले. पुढे त्यांनी म्हटले की डॉ. विजया माझी मामेबहीण आहे म्हणजे हा सन्मान आप्त-स्वकीयांकडूनच प्राप्त झाला आहे. म्हणून हा सन्मान मी डॉ. विजयाच्या स्मृतीलाच समर्पित करीत आहे.

त्यानंतर 'महाराष्ट्र टाइम्स'चे निवासी संपादक श्रीपाद अपराजित जी यांनी आपल्या वक्तव्या द्वारा आशाताईंच्या व्यक्तित्व व कृतित्वाचा उदाहरणांसह परिचय करून दिला. यानंतर "तरुण भारत" चे निवासी संपादक शैलेश पांडेय जी यांनी "शब्दसृष्टी प्रतिष्ठान" चे आभार मानून आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की आशाताईंचा गौरव हा साहित्य क्षेत्रातील ऋषिकेचा सन्मान आहे. समारंभाच्या प्रारंभी 'शब्दसृष्टी' चे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ. मनोहर जी यांनी समयोचित आपले मनोगत व्यक्त केले आणि आज, दिनांक 1 जुलै 2022 ला "डॉ. विजया स्मृती अनुवाद व शोध संस्था" ची स्थापना होत आहे, याची माहिती सुद्धा दिली. पाहुण्यांचे स्वागत 'शब्दसृष्टी' प्रतिष्ठानची विश्वस्त-सचिव व पत्रिकेची कार्यकारी संपादक मा. आशा रानी यांनी केले तर "सन्मान पत्रा" चे वाचन मा. रश्मी पदवाड-मदनकर यांनी केले. 'शब्दसृष्टी' प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व समारंभाचे संयोजक डॉ. अनिल यादवराव गायकवाड यांनी आभार-प्रदर्शन केले आणि संपूर्ण समारंभाचे कुशलतापूर्वक सूत्र-संचालन 'शब्दसृष्टी' प्रतिष्ठानचे विश्वस्त-कार्याध्यक्ष व पत्रिकेचे समन्वय संपादक प्राचार्य मुकुंद आंधळकर यांनी केले.

या समारंभाचे समन्वयन 'शब्दसृष्टी' परिवाराचे एक सन्माननीय सदस्य व पत्रिकेच्या संपादन समितीचे एक सदस्य आणि आजच्या दिवशी स्थापित "डॉ. विजया स्मृती अनुवाद व शोध संस्थे" चे एक संचालक डॉ. सतीश पावडे जी यांनी केले. समारंभात 'शब्दसृष्टी' पत्रिकेच्या "संत गाडगेबाबा व तुकडोजी महाराज विशेषांका" चे अतिथी संपादक डॉ. दिनकर येवलेकर जी आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार शेखर सोनी जी आणि आशाताईंच्या परिवाराचे सदस्य सुद्धा उपस्थित होते.

## पिंपळवाडी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण



आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यातील पिंपळवाडी ग्रामपंचायतमध्ये ग्रामसेवक भवते यांच्या माध्यमातून गावातील पिंपळवाडी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सोयगाव तालुक्यातील पिंपळवाडी ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून गावातील रस्त्यालगत व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. जंगलतोड व अन्य कारणांमुळे झाडांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत शासनाकडून प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवून जनजागृती केली जात आहे. ग्रामसेवक यांच्या माध्यमातून पिंपळवाडी गावात नुकताच वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमावेळी पिंपळवाडी ग्रामपंचायत सदस्य कैलास मुळे, सुरेश राघोरे, ग्रामपंचायत सदस्य, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे लोंबकळ्या विद्युत तारेमुळे जीवितहानी होण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज



**सावळदबारा :** सोयगांव तालुक्यातील सावळदबारा येथील महावितरण विभागाचे ३३ केव्ही उपकेंद्र असून त्यांनी देव्हारी ते वाघजाळ फाट्यापर्यंत ट्रीकटींगचे काम केले आहे. मात्र स्थानिक ठिकाणी सावळदबारा ठेकेदाराने काम न करता लाखो रुपयांचे बिल उचलून पोबारा केला मात्र याकडे सावळदबारा येथील महावितरण च्या ३३ केव्ही उपकेंद्राचे शाखा अभियंता जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचे चित्र सध्या सावळदबारा येथील ग्रामस्थांना पाहायला मिळत आहे.

आता जुलै महिना लागला असून अद्यापही वाकलेल्या विदयुत खांब व झाडामध्ये लोंबकळत असलेल्या तारेचे काम केलेले नाही. महावितरणचे कर्मचारी उघड्या डोळ्यांनी पाहून सुद्धा काहीच करतांना दिसत नाही. "तारेत झाड आहे का झाडेत तार आहे" हे कळत नाही. जाणूनबुजून हे कर्मचारी झोपेचे सोंग घेत असून.जून्या झालेल्या विद्युत तारा बदलण्याची व वाकलेल्या विदयुत खांब बदलुन व गावातील थ्रीकटींग चे काम करण्यात यावे अशा प्रकारचे निवेदन सुद्धा कनिष्ठ अभियंता अमोल घोडके यांच्याकडे एक वर्षापूर्वीच युवासेनेचे अध्यक्ष अतुल इंगळे, ग्रामपंचायत सदस्य मोलखेडा यांनी यांच्या कडे निवेदन दिले होते. परंतू त्या तक्रारीवर आजपर्यंत कोणतीच कारवाई झाली नाही.

सावळदबारा येथील ३० ते ३५ वर्षे जून्या झालेल्या विद्युततारा अत्यंत जीर्ण झाल्यामुळे आज त्या रस्त्यावर लोंबकळलेल्या अवस्थेत दिसत आहे. ठिक ठिकाणी या ताराचे तुकडे पडत असल्यामुळे नागरिकांच्या मोठा धोका निर्माण झालेला आहे. गावात बाहेर गावावरून व्यापारी कापूस, सोयाबीन, घेण्यासाठी येतात तर त्यांच्या भरलेल्या गाडीला तारा लागतात. या बरोबर गावातील वाकलेले जुनाट लोखंडी खांब त्वरित बदलण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केलीआहे त्या तारेमुळे व वाकलेल्या खांबामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

**सध्या पाऊस पडत नसल्याने आधीच आम्ही अस्वस्थ आहोत त्यात ३३ केव्ही महावितरण उपकेंद्र सावळदबारा कंपनीच्या दुर्लक्षामुळे आमच्या जिविताचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गावाच्या बाहेर असलेल्या बैलांच्या गोठ्यात चारापाणी काम करत असताना जर दुदैवाने काही या लोंबकळत असलेल्या विदयुत तारे हे झाडातून इकडून तिकडे गेलेले आहेत तर मी ३३ केव्ही महावितरण उपकेंद्र सावळदबाराचे जवाबदार जबाबदार कर्मचारी यांनाच जबाबदार धरण्यात येईल.**

**सुपडा निना सुरपाटणे**
**शेतकरी सावळदबारा**

तरी संबंधित विभागा अधिका-यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन मोलखेडा येथील ३० ते ३५ वर्षे जुने विद्युत तारा व लोखंडी खांब बदलण्यात यावे सध्या या ग्रामीण भागातील परिस्थिती पाऊस नसल्याने विदारक झाली आहे तसेच जनावरांना सुद्धा या परिसरात चारा झाला नाही. त्यामुळे काही गरीब लोक गाय, म्हशी व बकरीला चिंच पाला,अजनाचा पाला आणण्यासाठी लहान मुले गावाच्या जवळ असलेल्या झाडावर चढून पाला आणण्याचे काम करतात पण गावात थ्रीकटींग काम न झाल्यामुळे झाडातून गेलेले विद्युत तारे हे दिसत नाही. एखाद्या वेळेस खूपच मोठी जिवितहानी होऊ शकते हे काम तातडीने करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# गंगापूर तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांचा कृषिदिनी गौरव



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** 1 जुलै म्हणजे कृषी दिन या दिवशी हरित क्रांतीचे जनक स्व.श्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषीदीन म्हणून साजरी केली जाते. वर्षभर शेतात राबणाऱ्या शेतकरी बांधवांच्या प्रती आदर व्यक्त करणे हे या दिवसाचे वैशिष्ट्य कृषी दिनाच्या निमित्ताने गंगापूर तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी यांचा सोयाबीन तसेच आदी पिकांच्या उत्पादनात योग्य नियोजन व उत्पादकता वाढीसाठी केलेले प्रयत्न या बाबीसाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

उन्हाळी सोयाबीन उत्पादन,रुंद सरी वरंबा पद्धतीने सोयाबीन पेरणी आणि,अधिक उत्पादन देणाऱ्या सोयाबीन च्या वाणाची पेरणी हे प्रयोग तालुक्यातील अगरवाडगाव येथील प्रगत शील शेतकरी पांडुरंग वाघ नेहमी आपल्या शेतात करत असतात. व परिसरातील इतर ही शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करत असतात त्यांच्या प्रयोगशीलतेचा परिसरातील इतर शेतकरी बांधवांना फायदा होतो.आणि त्यांच्या प्रयत्नामुळे गंगापूर तालुक्यातील सोयाबीन पिकविणाऱ्या गोदावरी पट्ट्यात सोयाबीन बियाण्यांसाठी परिसरातील शेतकऱ्यांना इतर ठिकाणी बियाणे खरेदी करावी लागत नाही. यावेळी कायगाव येथील प्रयोगशील शेतकरी राहुल कुलकर्णी,भेंडाळ्याचे प्रयोगशील शेतकरी विक्रम परभने शंकरपूर येथील अभंग शेवाळे जामगाव येथील उमेश बंग आदी यांचा जिल्हा अधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी तालुका कृषी अधिकारी ज्ञानेशवर तारगे, कृषी मंडळ अधिकारी विष्णू मोरे आदींची उपस्थिती होती.

# शेतकरी पीक कर्जाच्या प्रतीक्षेत

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** कोरोना काळात शेतकऱ्यांचे अक्षरश कंबरडे मोडले आहे. अशा संकटाच्या काळात त्यास आर्थिक हातभार लावणे गरजेचे असताना अद्यापही बँकेने पीक कर्ज वाटपास सुरुवात केली नाही. कोरोना महामारीच्या काळामध्ये शेतकरी वर्गाला कोरोना व्यतिरिक्त अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यातच केंद्र सरकारने पेट्रोल डिझेलची दरवाढ केली त्यामुळे शेतकऱ्यांना शेती कामात व शेतीमाल विक्रीला नेण्यासाठी अधिकचे पैसे खर्च करावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकासाठी केलेला खर्च निघणेही अवघड झालेले आहे. त्यातच केंद्र शासनाने खताच्या दरात मोठी वाढ केली आहे.

दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले



असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व अधिकाऱ्यांनी या प्रकरणात दखल घेऊन सर्व बँक शाखेला आपल्या स्तरावरून सूचना द्याव्यात तसेच गावनिहाय शेतकऱ्यांना बँकेत बोलावून अथवा गावनिहाय कॅम्पचे आयोजन करून त्वरित पीक कर्ज वाटप संबंधीच्या प्रक्रियेस सुरुवात करावी अशी मागणी गोर सेनेच्या वतीने संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष, करतार सुपडा चव्हाण यांनी केली आहे.

# सोयगाव वैद्यकीय अधीक्षक डॉ. कसबे यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शंकर कसबे यांचा सेवानिवृत्तीबद्दल गुरुवार, ३० रोजी मोठ्या सन्मानाने सत्कार करण्यात आला. ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. शंकर कसबे यांच्या सेवापूर्तीबद्दल सत्कार केला.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित, उपकोषागार अधिकारी संदीप देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पवार, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. वैद्यकीय अधिकारी विलास राजपूत सावळदबारा,डॉ. धनंजय निरगुडे, डॉ. श्याम गायकवाड नेत्रचिकित्सा अधिकारी सुहासिनी जवळे आदींनी मनोगत व्यक्त केले.यावेळी नगर पंचायतचे कार्यालयीन अधीक्षक भगवान शिंदे,औरंगाबाद येथून डॉ. मोतुपोवळे साहेब अध्यक्ष, डॉ. पी.एम.कुलकर्णी, डॉ. पल्लवी मॅंडम, डॉ. अभिजित खंदारे, डॉ. पोरेगांवकर,डॉ. दिनाची खंदारे, डॉ. मोरे,डॉ. विजय दळवी, डॉ. टारपे,डॉ. अहिरराव, डॉ. धिरज पाटील, डॉ. मनोज डोंगळीकर,अपेक्षा ठेंग, सोनाली झिंजे, मंगला खंडागळे, वर्षा ठोंबरे, गीता घाडगे, सीमा फुले, कार्यालयीन अधीक्षक रवींद्र सूर्यवंशी, वसंतराव कारके, चेतन वाकलकर विक्रांत जोहर, महेंद्र चित्राल, सुनील वानखेडे, कैलास पाटील, सुनील मगरे, कमल तायडे, सुशीलाबई रोकडे, निर्मला जेठे, शेख हबीब व दारासिंग राठोड, तालुका आरोग्य कार्यालयाचे कर्मचारी आदी उपस्थित होते. सुनील वानखेडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

